जगप्रसिद्ध नामांकित ब्रॅण्डचे
दर्जेदार होम अप्लायसेंस
एकाच छता खाली...
• फ्रीज • ए.सी. • वॉशिंग मशिन
• एलईडी टीव्ही • होमथिएटर
• मोबाईल • होम अप्लायन्सेस
सुलभ हप्त्यावर उपलब्ध 0% फायनान्स
COMPRO Systems & Services
HDB FINANCIAL SERVICES BAJAJ FINSERV
अंबर प्लाझा, एचडीएफसी बँके जवळ, स्टेशनरोड, अ.नगर. मो. ९३२५१०३०५०
PHILIPS INTEX Whirlpool SONY SAMSUNG Godrej BLUE STAR TCL Haier




# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, बुधवार दि. १८.०६.२०२५ | अंक नं. ६७ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020

साऊथ इंडियन/पावभाजी/पंजाबी डिशेस/छोले भटूरे/पावभाजी/मिल्कशेक
नगरकर खवय्यांच्या पसंतीस उतरलेला
साऊथ इंडियन
Sambar
PURE - VEG | Aromas of South !
Restaurant Timing 8 AM to 11 PM
एल.जी.शोरुम समोर, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर. मो. 85306 40202
पार्सल सुविधा उपलब्ध..

स्मार्ट असो वा मार्ट..मिल असो वा मॉल...
सर्वात स्वस्त देणार फक्त राजपाल !
आला रे आला राजपाल सेल आला..!
खरेदी | खरेदीवर पॉईंट | पॉईंट्सवर गिफ्ट
30 ते 70% डिस्काउंट सेल
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल
संगमनेर © (02425) 222226
अ. नगर © (0241) 2999299
नारायणगाव © (02132) 242132
श्रीरामपूर © (02422) 220090

# नगर शहर परिसरात दुचाक्यांबरोबरच चारचाकी वाहनांच्याही चोऱ्या वाढल्या

## २ दिवसांत ३ आलिशान कार गेल्या चोरीला, ३ दुचाकी चोरीचेही गुन्हे दाखल

नगर - नगर शहर परिसरातून दुचाक्या चोरीला जाण्याचे सत्र सुरूच असून गेल्या काही दिवसांत विविध ठिकाणाहून अनेक मोटारसायकल चोरीला गेल्या आहेत. त्याच बरोबर आता चारचाकी वाहनेही चोरीला जाऊ लागले आहेत. गेल्या २ दिवसांत ३ अलिशान वाहने तसेच ३ दुचाक्या चोरीला गेल्याचे गुन्हे शहरातील कोतवाली, तोफखाना तसेच भिंगार कॅम्प, नगर तालुका पोलिस ठाण्यात दाखल करण्यात आले आहेत. या वाहन चोरांना पकडून या चोऱ्या रोखण्याचे मोठे आव्हान पोलिसांसमोर आहे.

शहरातील विविध भागातून दुचाकी बरोबरच चारचाकी वाहने चोरीला जात आहेत. विशेष करून शासकीय कार्यालये, दवाखाने, हॉटेल्स यांच्या पार्किंगमधून दुचाक्या चोरीला जाण्याचे प्रमाण अधिक आहे. जिल्हा शासकीय रुग्णालयाच्या आवारातून, जिल्हा परिषद कार्यालयाच्या आवारातून गेल्या काही दिवसांत अनेक दुचाक्या चोरीला गेल्या आहेत. त्यातील एकाही गुन्ह्याचा तपास लागलेला नाही. उपनगरात नागरिकांच्या रहिवासी इमारतीच्या पार्किंग मधून रात्रीच्या वेळी वाहने चोरीला जाण्याचे प्रमाण वाढले आहे.

शहरात कधी कधी एकाच दिवसात ४ ते ५ दुचाक्या चोरीला जाण्याच्या घटना घडल्या आहेत. परिसरात असलेल्या सीसीटीव्ही फुटेजमध्ये हे चोर कैद होतात. पण पोलिसांना ते हाती लागत नसल्याने वाहने चोरीला गेलेले नागरिक हतबल झाले आहेत. सध्या दुचाकी वाहनांच्या किंमती मोठ्या प्रमाणात वाढलेल्या आहेत. कोणतीही दुचाकी खरेदी करायला गेले की किमान लाखभर रुपये मोजावे लागतात. अनेक जण फायनान्स कंपन्यांचे कर्ज घेवून वाहने खरेदी करतात पण ते कर्ज फिटायच्या पूर्वीच दुचाकी चोरीला गेल्याने वाहन तर गेले वरून डोक्यावर कर्ज तसेच राहिले अशी अवस्था नागरिकांची होत आहे. तशीच अवस्था चारचाकी वाहन धारकांचीही आहे.

### पाईपलाईन रोडवरून आलिशान कारची चोरी

शहरातील गजबजलेल्या माणिकनगर येथील एमएसईबी कॉलनीतून सनी प्रशांत चोरडिया यांच्या मालकीची टाटा कंपनीची काळ्या रंगाची कॅरिअर कार (क्र. एम एच १६ सी व्ही ००३१) ही १५ जून रोजी रात्री ८.३० ते १६ जून रोजी सकाळी ८ वाजण्याच्या दरम्यान त्यांच्या घरासमोरील रस्त्यावरून चोरीला गेलेली आहे. त्याच दिवशी रात्री सारसनगर येथील धोंडीराम लहानु चोभे (वय ५८, रा. राजीव गांधी पतसंस्था शेजारी, सारसनगर) यांची महिंद्रा अँड महिंद्रा कंपनीची स्कॉर्पिओ (क्र. एम एच १६ सी व्ही ७१३२) ही गाडी चोरीला गेलेली आहे. आता अशाच प्रकारे सावेडी परिसरातील वसंत टेकडी येथील पाईपलाईन रोडवरील साईदीपनगर येथे घराच्या समोर रस्त्याच्या कडेला लॉक करुन पार्क केलेली टाटा कंपनीची कॅरियर कार (क्र. एम एच १६ सीई ७७७२) अज्ञात चोरट्यांनी चोरुन नेली. ही घटना १५ जून रोजी रात्री ९ ते १७ जून रोजी सकाळी ६ वाजण्याच्या दरम्यान घडली.

याप्रकरणी महेश सुरेश गावडे (वय ३०,रा. साईदीपनगर, पाईपलाईन रोड, वसंत टेकडी, सावेडी) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन तोफखाना पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### ३ मोटारसायकल गेल्या चोरीला

अमोल मल्हारी शिंदे (वय ३१, रा. साई स्वप्न अपार्टमेंट, एल अँण्ड टी गेस्ट हाऊसजवळ, सावेडी) यांनी त्यांची होंडा कंपनीची युनिकॉर्न मोटारसायकल (क्र. एम एच १६ एस सी ४२१६) घरासमोर रस्त्याच्या कडेला हॅन्डेल लॉक करुन लावलेली *(पुढील मजकूर पान २ वर)*

# कॅनॉलच्या कडेला युवकाला पेट्रोल टाकून जाळून मारले

## नगर - पुणे महामार्गावरील नारायणगव्हाण येथील घटना

नगर - एका अंदाजे २८ ते ३० वयाच्या युवकास पेट्रोल टाकून जाळून मारल्याची घटना नगर - पुणे महामार्गावर पारनेर तालुक्यातील नारायणगव्हाण गावाजवळील असलेल्या कुकडी कॅनॉलच्या कडेला १८ जून रोजी सकाळी ६.३० च्या सुमारास उघडकीस आली आहे.

नारायण गव्हाण गावातील काही नागरिक सकाळी कॅनॉलच्या कडेने मॉर्निंग वॉक करत असताना त्यांना अर्धवट जळलेल्या अवस्थेत एका इसमाचा मृतदेह आढळून आला. त्यांनी ही बाब सुपा पोलिसांना कळविली. ही माहिती मिळताच सुपा पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक सोमनाथ दिवटे यांनी पोलिस पथकासह घटनास्थळी धाव घेत पाहणी केली. सदर मयत इसमाचे वय अंदाजे २८ ते ३० असून केस लांब (जुनी धोनी स्टाईल) आहेत.

मयताची उंची ५.५० फुट रंग गोरा तसेच मयत याचे अंगावर पिवळ्या रंगाचा फुल भाईचा शर्ट व काळे रंगाची आरमानी पॅन्ट असून मयताचे उजव्या पायाच्या नडगीवर जुन्या जखमेचा व्रण दिसत आहे. त्याला पेट्रोल टाकून जाळण्यात आले असल्याचे प्रथम दर्शनी दिसून येत असून शवविच्छेदन अहवाल आल्यावर त्याचा अगोदर खुन करून पुरावा नष्ट करण्यासाठी जाळण्यात आले की जाळूनच मारण्यात आले हे स्पष्ट होईल असे स.पो.नि. दिवटे यांनी सांगितले. या मयताची ओळख पटलेली नसून याबाबत कोणाला काही माहिती असल्यास मो. ८१०८८५११०० यावर फोन करून संपर्क साधावा असे आवाहनही त्यांनी केले आहे.

दरम्यान या घटनेची माहिती मिळाल्यावर पोलिस अधिक्षक सोमनाथ घार्गे, अप्पर पोलिस अधिक्षक प्रशांत खैरे, नगर ग्रामीणचे प्रभारी पोलिस उपअधीक्षक अमोल भारती यांच्या सह स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकानेही घटनास्थळी भेट देत पाहणी केली.

# पोलीस ठाण्याच्या हद्दीत अवैध धंदे आढळल्यास अधिकाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई करणार

## जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांचा व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे सर्व पोलिस अधिकाऱ्यांना दिला इशारा



नगर - नगर जिल्हयातील प्रलंबित गुन्हयाचा आढावा घेऊन, गुन्हयांची वेळेत निर्गती करणे, अवैध धंद्याचे उच्चाटन करण्याबाबत सर्व अप्पर पोलीस अधीक्षक, उपविभागीय पोलीस अधिकारी, सर्व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांना सक्त कारवाईबाबत आदेश जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी दुरदृश्य प्रणालीव्दारे (व्हीडीओ कॉन्फरन्स) दिले आहेत. पोलीस ठाण्याच्या हद्दीत अवैध धंदे सुरु दिसल्यास संबंधित पोलीस ठाण्याच्या प्रभारी अधिकाऱ्यावर शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल, असा इशाराही पोलीस अधीक्षक घार्गे यांनी दिला आहे.

पोलीस अधीक्षक घार्गे यांनी १७ जून रोजी व्ही. सी. द्वारे जिल्ह्यातील सर्व पोलिस अधिकाऱ्यांशी संवाद साधला. पोलीस ठाणे येथे दाखल असलेले प्रलंबित गुन्हयांचा तत्काळ योग्य तो तपास करुन, गुन्हयांची निर्गती करणेबाबत आणि पाहिजे व फरारी आरोपींचा शोध घेऊन, योग्य ती कायदेशिर कारवाई करणेबाबत सुचना दिल्या. विशेषत: गंभीर गुन्हे करणारे आरोपी यांचेवर प्रतिबंधक कारवाई करणेबाबत विशेष सुचना देण्यात आल्या आहेत.

नगर जिल्हा हद्दीत कोठेही अवैध धंदे (उदा. अवैध गुटखा/ सुगंधी तबांखु विक्री, गोमांस विक्री, अवैध दारु, गांजा, ड्रग्स विक्री, अवैध वाळु, गौणखनिज उपसा व विक्री, अवैध हत्यार विक्री व बाळगणे, अवैध पेट्रोलियम पदार्थ विक्री, अवैध वाहतुक, जुगार, बिंगो, ऑनलाईन जुगार इ., वाहन चोरी व विक्री तसेच महिला व बाल यांचे अनुषंगाने अनैतिक मानवी तस्करी, पिटा व इत्यादी) अशा प्रकारचे अवैध धंद्याचे १०० समूळ उच्चाटन करावे. ज्या ठिकाणी अवैध धंदे चालु आहेत, अशा ठिकाणी तात्काळ छापे टाकुन कारवाई करावी. ज्या ठिकाणी कारवाई केली त्या ठिकाणी नियमीत भेट देऊन वारंवार केसेस कराव्यात.

अवैध व्यवसाय करणारे लोकांना कायदेशीर व्यवसाय करणेबाबबतचे समुपदेशन करावेत. प्रतिबंधात्मक कारवाई करुन, सराईत गुन्हे करणारे गुंड, गुन्हेगारां विरुध्द आपण स्वत: वैयक्तिक लक्ष घालून कडक कायदेशीर कारवाई करुन, अवैध धंदयांचे पुर्णत: उच्चाटन करावे अशा सुचना दिल्या आहेत. दिलेल्या सुचनाप्रमाणे केलेल्या कारवाईचा अहवाल प्रत्येक मासिक गुन्हे आढावा बैठकीमध्ये पोलीस अधीक्षक हे स्वत: घेणार असलेबाबत कळविले आहे.

### छापेमारीसाठी विशेष पथक नियुक्त

पोलीस अधीक्षक यांनी नेमलेले विशेष पथकाने पोलीस ठाणे हद्दीमध्ये छापे टाकले असता, कोणत्याही प्रकारचा अवैध धंदा ज्या पोलीस ठाणे हद्दीमध्ये निर्देशनास येईल, त्या संबंधीत पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी हे जबादार राहातील व त्यांचे विरुध्द शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल, असा इशारा पोलिस अधिक्षक घार्गे यांनी दिला आहे.

सर्व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांना पोलीस ठाणे हद्दीत कोणतेही अवैध धंदे सुरु होणार नाहीत, याची दक्षता घेणेबाबतच्या सक्त सुचना दिल्या आहेत, तसेच पोलीस अधीक्षक यांनी नियुक्त केलेले विशेष पथक कार्यरत राहिल.असे ही पोलीस अधीक्षक यांनी या वेळी म्हटले आहे.

B. P. H. E. SOCIETY'S
IMS - ACADEMY OF FINE & PERFORMING ARTS
IMS CAMPUS, STATION ROAD, AHILYANAGAR.
Admissions Open for all Courses
Bharatnatyam & Kathak Dance
Age Group - 6 years and above I only female candidates I
Visharad
I Eligibility - Completed Madhyama Purn
Alankar
I Eligibility - Completed Visharad
Nrityayoga
• Age Group - 16 years and above •
Based on Research by : Guru Dr. Swati Daithankar (Renowned Bharatnatyam Exponent)
Yes ! you can dance
Where every step brings confidence and Joy !
• Age Group - 25 years and above (Ladies Special Batch) •
Under the guidance of : Guru Pandita Maneeshatai Sathe (Renowned Kathak Exponent)
For more details contact
Mrs. Chaitrali Pande, Principal - AFPA, Mob. : 98810 07543 | Dr. Rucha Tandulwadkar, Co-ordinator - AFPA, Mob. : 98503 70141

बाथरूम मधल्या शॉवर किंवा बॉडी जेटला प्रेशर कमी येतोय का?
तर आजच घेऊन या प्रेशर बूस्टर पंप आणि बनवा आपलं बाथरूम आनंददायी
अधिकृत विक्रेते!
Satbhai Mala, Shop No 8, Delhi Gate Rd, Near Gajanan Hospital, Ahilyanagar
9145008009 / 9822542011
ABHAY SALES CORPORATION & HARDWARE

CERTIFICATE COURSE IN ADVANCE ACCOUNTING
COURSE DETAILS
COMPUTER APPLICATION
ADVANCE ACCOUNTING
TAXATION, BANKING
AUDITING
100% JOB ASSISTANCE
Experience Faculties | 1 Lac + Students Trained | Job Assistance
CAA IS NOT JUST A COURSE BUT A GREAT INVESTMENT IN YOUR CAREER
An ISO 9001:2015 Certified DiSHA COMPUTER INSTITUTE
Delhi Gate Branch 9371051769 | Old ST stand Branch 9371151769 | Pipeline Branch 7447761769

जैन सोशल फेडरेशनद्वारा संचलित
आनंदऋषिजी हॉस्पिटल अॅण्ड मेडिकल रिसर्च सेंटर
हृदयरोग मोफत तपासणी शिबीर
शुक्रवार - दि. २०-६-२०२५ * वेळ : सकाळी १० ते २
बायपास सर्जरी, हृदयातील झडपबदलणे, हृदयातील छिद्र बुजवणे. लहान मुलांच्या हृदय शस्त्रक्रिया व अॅन्जिओप्लास्टी इ.
अॅन्जिओग्राफी रू. 3000/- मध्ये
महात्मा ज्योतीबा फुले जनआरोग्य योजने अंतर्गत हृदय शस्त्रक्रिया व अॅन्जिओप्लास्टी मोफत केल्या जातील.
कार्डिओलॉजीस्ट, डॉ. राहुल अग्रवाल, डॉ. अमित थोपटे, डॉ. अनिकेत कटारिया
हायटेक पॅथोलॉजी लॅब व 35 अत्याधनिक डायलेसीस मशिनद्वारे सेवा उपलब्ध.
महावीर भवन: रुग्ण व रुग्णांचे नातेवाईक यांचे करिता अल्पदरात निवासाची व्यवस्था उपलब्ध. भोजन रु. 35/- मात्र
24 तास आपल्या सेवेत आनंदऋषीजी ब्लड बँक
डिजिटल एक्सरे रू. 250/- | सोनोग्राफी रू. 800/- | सिटीस्कॅन रू. 1250/- | एम.आर.आय. रू. 2500/-
१२४, आनंदऋषिजी मार्ग, अहिल्यानगर - ४१४ ००१. फोन : ०२४१-२३२०४७३/७४/७५/७६
E-mail : admin@anandrishiji.com / anandrishiji@rediffmail.com / Website : anandrishijihospital.com

SONI TILES AND MARBLE INDUSTRIES Since 1965
Wholesalers & Manufacturers of - Ceramic Wall & Floor Tiles, Vitrified Tiles, Paving Blocks, Marble & Granite
सोनी टाईल्स अॅण्ड मार्बल इंडस्ट्रिज
Opp. Munot Estate, Station Road, Ahmednagar. Tel. : (0241) 2418720 Mob. 9372497999

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
# नवा मराठा
फोन–२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# वाहणारा ओढा अतिक्रमणामुळे बुजवल्याने पावसाचे पाणी तुंबल्याने रस्ते झालेत जलमय

नगर – शहरातील पाईपलाईन रोड, श्रीकृष्णनगर परिसरातील वैष्णवी कॉलनीत पावसामुळे तुंबलेल्या पाण्याने जलमय होत आहे. या गाळयुक्त व मैलामिश्रित पाण्यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले असून, तातडीने पाण्याचा निचरा व्यवस्था सुधारण्यासाठी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी स्थानिक नागरिकांनी मनपा आयुक्त यशवंत डांगे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. या प्रसंगी माजी नगरसेवक निखील वारे, विजयकुमार कुलकर्णी, प्रकाश कुलकर्णी, रमेश कुलकर्णी, विशाल साबळे, श्रीमती भंडळकर, दत्तात्रय कुलकर्णी, जीवन क्षीरसागर, कौशल्या लोखंडे आदी नागरिक उपस्थित होते.



शहरातील पाईपलाईन रोड, श्रीकृष्णनगर परिसरातील वैष्णवी कॉलनीत पावसामुळे तुंबलेल्या पाण्याने जलमय होत आहे.

वैष्णवी कॉलनीतील नागरिकांना प्रत्येक पावसात घरात साचलेल्या पाण्याचा त्रास सहन करावा लागत आहे. या पाण्यासोबत गाळ, मैला आणि दुर्गंधीयुक्त पाणी घरात शिरत असून, लहान मुलांपासून वृद्धांपर्यंत साऱ्यांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होत आहे.

निवेदनात म्हटले आहे की, पूर्वी कॉलनीजवळून वाहणारा ओढा अतिक्रमणामुळे बुजवण्यात आला, त्यामुळे नैसर्गिक निचऱ्याचा मार्ग बंद झाला आहे. त्याऐवजी लहान पाईपमधून पाण्याचा निचरा करण्यात येत असून, मुसळधार पावसात या पाईपांची क्षमताच अपुरी पडते. परिणामी पाण्याचा संपूर्ण प्रवाह थेट कॉलनीत शिरतो व परिसर जलमय होतो.

स्थानिकांनी अनेकवेळा मनपा प्रशासनाकडे तक्रारी केल्या, मात्र आजवर कुठलीही ठोस कार्यवाही न झाल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. त्यामुळे अखेर त्यांनी थेट आयुक्त यशवंत डांगे यांच्याकडे निवेदन दिले. आयुक्त डांगे यांनी याची गंभीर दखल घेत वैष्णवी कॉलनीची पाहणी करून तातडीने उपाययोजना करण्याचे आश्वासन नागरिकांना दिले.

## प्रेरणादायी अक्षरधन...



### भेटवस्तू अशी की आनंद वाढावा अशी

सृजनशील माणसं भेटवस्तू देत घेत क्षणांचा, सणांचा व नात्यांचा आनंद वाढवत असतात. एखाद्याचा खास दिवस उचित भेटवस्तू दिल्याने खचितच अधिक आनंद, उत्साहाने द्विगुणित होतो.

युवा मित्रांच्या तरुणाईला या भेटवस्तूचं वेगळंच आकर्षण असतं म्हणून तर विविध दिवसांना विशेष भेटवस्तूंची रेलचेल दिसते.

खरंतर भेटवस्तूंतून आनंद तर मिळायला हवाच, पण त्याचा खरा उपयोग व लांबवर उपयुक्तता असेल तर अधिक उत्तम.

आजकाल जाणकार, रसिक वाचक, लग्न, वाढदिवसांना पुस्तकांचे नजराणे देतात हेही चांगले. वास्तुशास्त्रात अशा अनेक वनस्पती सांगितल्या आहेत, ज्यांना भेटवस्तू म्हणून देणे किंवा मिळवणे भाग्यवान मानले जाते. अशावेळी अशी काही रोपे, झाडे भेट म्हणून दिली जाऊ शकतात, ज्यामुळे घराचे, कार्यालयाचे सौंदर्य वाढते. यासोबत सौभाग्यही वाढते. या वनस्पतींनी रंकांनाही राजा बनता आले आहे.

आजच्या मनी मार्केटच्या दुनियेत छानसं मनी प्लांट हा गिफ्टचा सर्वोत्तम पर्याय असू शकतो. ते घरात ठेवल्याने धनसमृद्धी...सौंदर्य वाढते.

जर एखाद्याला पीस लिली भेट म्हणून मिळाली तर समजून घ्या की घरात पसरलेली अशांतता संपणार आहे. ही वनस्पती सौभाग्य व शांतीचे प्रतीक असून हवा शुद्ध करून सकारात्मक उर्जा देते.

शेवंती ही गणेशजी व लक्ष्मीची सर्वात आवडती वनस्पती आहे. वास्तुशास्त्रानुसार ही शेवंती भेट दिली तर घरात आशीर्वाद राहतात. शिवाय पिवळ्या रंगांची फुले वेगळेच सौंदर्य देतात. मग आता यापुढे अशा वस्तूच भेट देऊन नातेसंबंध दृढ करणार ना?

## उशिरापर्यंत हॉटेल सुरू ठेवण्यासाठी पोलिसांनी मालकाकडे मागितले पैसे

### २ पोलिस कर्मचाऱ्यांसह एका आरोपीवर 'लाचलुचपत'ची कारवाई

नगर – रात्री उशिरापर्यंत हॉटेल सुरू ठेवण्यासाठी पाथर्डी पोलीस ठाण्यातील पोलीस अंमलदाराने दरमहा हप्ता मागितल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. नाशिक लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रचलेल्या सापळ्यात पोलीस अंमलदार लक्ष्मण सुखदेव पोटे (वय ३५, रा. तारकेश्वर कॉलनी, पाथर्डी) यास रंगेहाथ पकडण्यात आले असून दुसरा पोलीस अंमलदार रामदास जयराम सोनवणे (रा. घोडेगाव, ता. नेवासा) लाच रक्कमेसह पसार झाला आहे. विशेष म्हणजे, ही लाच सुरूवातीला पोलीस कोठडीत असलेल्या संशयित आरोपीला स्वीकारण्यास भाग पाडले व नंतर अंमलदार सोनवणे याच्याकडे देण्यास सांगितले.

तक्रारदार (वय २८, रा. पाथर्डी) यांचे शिवनेरी मिसळ नावाचे हॉटेल पाथर्डी येथे आहे. हे हॉटेल रात्री १० नंतरही सुरू ठेवले जात असल्याने पोलीस अंमलदार लक्ष्मण पोटे याने हॉटेलवर कारवाई करण्याची धमकी देत तक्रारदाराकडून दरमहा दोन हजार रूपयांची लाच मागितली होती. या त्रासाला कंटाळून तक्रारदाराने १५ जून रोजी नाशिक लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दाखल केली. तक्रारीची खातरजमा करण्यात आल्यानंतर, पोटे याने दीड हजार रूपयांच्या तडजोडीवर लाच घेण्यास तयारी दर्शवली. त्यानुसार, १७ जून रोजी लाचलुचपत विभागाच्या पथकाने सापळा रचला. पोटे याने तक्रारदारास पाथर्डी येथील उपजिल्हा रूग्णालयात बोलावले व त्याच्यासमवेत असलेल्या पोलीस कोठडीतील संशयित आरोपी राहुल शिवाजी साबळे (वय २२, रा. शिक्षक कॉलनी, माळी बाभुळगाव, ता. पाथर्डी) याच्यामार्फत ही रक्कम स्वीकारण्यास सांगितले.

दरम्यान, राहुल साबळे याने तक्रारदाराकडून दीड हजार रूपये स्वीकारले व ती रक्कम पोलीस अंमलदार रामदास सोनवणे याच्याकडे सुपूर्त केली. मात्र, सोनवणे ही रक्कम घेऊन पळून गेला आणि पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न केला. लाचलुचपत विभागाच्या कारवाईदरम्यान लक्ष्मण पोटे याला ताब्यात घेण्यात आले असून, त्याच्यासह रामदास सोनवणे आणि आरोपी राहुल साबळे यांच्याविरोधात पाथर्डी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## शासकीय मोजणी फी भरून २ वर्ष उलटले तरीही मोजणी केलेली नसल्याच्या निषेधार्थ भूमीअभिलेख कार्यालयात ठिय्या आंदोलन

नगर – मौजे शिराढोण तालुका नगर येथील शेतकरी विश्वास भाऊसाहेब फुलारी यांनी आपल्या शेतजमिनीची अति तातडी शासकीय मोजणी होण्यासाठी २० एप्रिल २०२३ रोजी फी भरून अर्ज केला होता. अद्यापही भूमी अभिलेख कार्यालयातील कर्मचाऱ्यांनी व अधिकाऱ्यांनी मोजणी केलेली नसल्याच्या निषेधार्थ जन आधार सामाजिक संघटनेच्यावतीने भूमी अभिलेख कार्यालयात ठिय्या आंदोलन करण्यात आले. यावेळी अध्यक्ष प्रकाश पोटे, विश्वास फुलारी, अशोक बनसोडे, सुरेश कसाब आदी पदाधिकारी उपस्थित होते.


अति तातडी शासकीय मोजणी फी भरून दोन वर्ष होऊन देखील मोजणी अद्यापही झाली नसल्याच्या निषेधार्थ भूमीअभिलेख कार्यालयात ठिय्या देण्यात आला.

पुढे म्हटले आहे की, अति तातडी शासकीय मोजणी फी भरून दोन वर्ष होऊन देखील मोजणी अद्यापही झालेली नाही. तसेच विचारणा केली असता उडवाउडवीची उत्तरे दिल्याने उपाधीक्षक भूमी अभिलेख नगर तालुका यांच्या कार्यालयाबाहेर ठिय्या आंदोलन करण्यात आले. विश्वास फुलारी यांची वडिलोपार्जित शेती क्षेत्र मौजे शिरढोण तालुका नगर येथील उक्कडगाव शिवलगत आहे. ते क्षेत्र हद्द कायम करण्यासाठी तसेच मोजणी करण्याकरिता अहिल्यानगर भूमी अभिलेख कार्यालयात २० एप्रिल २०२३ रोजी दोन वर्षांपूर्वी अती तातडीची फी भरून अर्ज केलेला होता. सदरच्या क्षेत्राची अति तातडीची मोजणी फी भरल्याने त्याचवेळी २ ते ३ महिन्याच्या आत मोजणी होणे हे अपेक्षित होते. परंतु त्यानंतर या मोजणीचे काम भूमी अभिलेख विभागाकडे दिलेले होते. शेतकरी विश्वास फुलारी यांनी अनेक वेळा प्रत्यक्ष संपर्क करून भेटून मोजणी संदर्भात जाब विचारला असता त्यांनी आज उद्या असेच उडवाउडवीचे उत्तरे दिले गेले. या विभागामध्ये शेतकऱ्यांची अशीच पिळवणूक मोठ्या प्रमाणात होत असते. शेतकऱ्यांचे जमीन मोजणी कामे वेळेवर होत नसल्याने भूमी अभिलेख कार्यालयाच्या भोंगळ्या कारभाराच्या निषेधार्थ ठिय्या आंदोलन करण्यात आले व पातळीने शेतजमीन मोजून देण्यात यावी अन्यथा तीव्र स्वरूपाचे आंदोलन करणार असल्याचे म्हटले आहे.

## मंडल अधिकाऱ्याकडून घर जप्तीस मुदतवाढ मिळवून देण्यासाठी लाच घेताना रंगेहाथ पकडले

नगर – भिंगार तहसीलच्या मंडळ अधिकारी कार्यालयाने दिलेल्या घर जप्तीच्या नोटीसची तारीख मंडळ अधिकाऱ्यांकडून वाढवून देण्याच्या मोबदल्यात २० हजारांची लाच घेताना खाजगी व्यक्तीला रंगेहाथ पकडण्यात आले. बँक रिकव्हरी कर्मचारी जहीर अहमद इक्बाल मुलानी (वय ३०, रा. रेहमानिया मशीद जवळ, एकनाथ नगर, केडगाव) असे त्याचे नाव आहे. नाशिकच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने ही कारवाई केली.

तक्रारदार व्यक्तीला भिंगार मंडळ अधिकाऱ्यांकडून घर जप्तीची नोटीस बजावण्यात आली होती. या नोटीसीची तारीख मंडळ अधिकाऱ्यांकडून वाढवून देण्यासाठी मुलानी याने मंडळ अधिकाऱ्याच्या नावाने २० हजारांच्या लाचेची मागणी केली. लाच घेताना पथकाने त्याला रंगेहाथ पकडले. त्याच्या विरोधात भिंगार कॅम्प पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती. पोलिस उपअधीक्षक संतोष पैलकर यांच्या नेतृत्वाखाली प्रफुल्ल माळी, दिनेश खैरनार, अविनाश पवार यांच्या पथकाने ही कारवाई केली.

## ज्ञानेश्वर भताने याचे अपघाती निधन

नगर – पाथर्डी रोडवर नगर तालुक्यातील सोनेवाडी गावच्या शिवारात मेहकरी फाट्यावर रस्त्याच्या कडेला उभे असलेल्या ज्ञानेश्वर बाबासाहेब भताने (वय २६, रा. वेताळवाडी, मेहेकरी ता. नगर) यास भरधाव वेगातील अज्ञात वाहनाने धडक दिली. या धडकेत ज्ञानेश्वर हा गंभीर जखमी होवून मयत झाल्याची घटना ११ जून रोजी रात्रीच्या सुमारास घडली. याप्रकरणी बाबासाहेब मारुती भताने (वय ५७, रा. वेताळवाडी, मेहेकरी ता. नगर) यांनी नगर तालुका पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरून पोलिसांनी अज्ञात वाहनचालकाविरुद्ध अपघाताचा गुन्हा दाखल केला आहे. त्याच्या पार्थिवावर मेहकरी नदीच्या काठी अंत्यसंस्कार करण्यात आले. त्याच्या पश्चात वडील व एक भाऊ असा परिवार आहे.

## ताराबाई निकम यांचे वृद्धापकाळाने निधन



नगर – नगर तालुक्यातील खडकी येथील रहिवासी ताराबाई पोपटराव निकम (वय ७४) यांचे १८ जून रोजी सकाळी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्यावर खडकी येथे दुपारी अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या पश्चात १ विवाहित मुलगा, ३ विवाहित मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे. खडकी येथील शेतकरी भारत निकम यांच्या त्या आई होत.

## प्रा. डॉ. शंकर चव्हाण यांचे अल्प आजाराने निधन



नगर – पार्थ विद्या प्रसारक मंडळाचे सदस्य, बाबुजी आव्हाड महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. डॉ. शंकर बाळाजी चव्हाण (वय ६४) यांचे १८ जून रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्यावर पैठण रोड येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पत्नी, १ मुलगा, १ मुलगी, सुन, जावई, नातवंडे असा परिवार आहे. ते साहित्यिक, कवी तसेच शाहू, फुले, आंबेडकर चळवळीचे मार्गदर्शक होते.

## नागरदेवळे येथील अशोक बोरुडे यांचे निधन



नगर – नागरदेवळे (ता. नगर) येथील अशोक मच्छिंद्र बोरुडे (वय ५९) यांचे नुकतेच ह्दयविकाराच्या झटक्याने निधन झाले. ते एम.ई.एस. (भुईकोट किल्ला) येथे कार्यरत होते. धार्मिक व मनमिळावू स्वभाव असल्याने ते सर्वांना परिचित होते. त्यांच्या पश्चात एक मुलगा, दोन मुली, जावई, सुना, नातवंडे असा परिवार आहे. नेत्रदूत जालिंदर बोरुडे यांचे ते चुलत बंधू होते.

## सुखदेव बोंबले यांचे अल्प आजाराने निधन



श्रीरामपूर – येथील शेतकरी सुखदेव माधव बोंबले (वय ७६) यांचे अल्पश: आजाराने दु:खद निधन झाले.

त्यांच्या पश्चात पत्नी, भाऊ, एक मुलगा, तीन मुलगी, पुतणे, जावई, नातवंडे असा परिवार आहे. शेतकरी बबन बोंबले यांचे थोरले बंधू, साक्षी किराणाचे मालक दिपक बोंबले यांचे वडील, दिलीप, सचिन व नवनाथ बोंबले यांचे चुलते होत.

# महापालिकेच्या 'क्षयरोग दुरीकरण उपक्रमांचे' पंतप्रधान कार्यालयाच्या उपसचिवांकडून कौतुक

### अहिल्यानगर महानगरपालिकेच्या दवाखान्यातील सुविधांची पाहणी करून अधिकारी आणि कर्मचाऱ्यांशी साधला संवाद

नगर – राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमाचा अभ्यास करण्यासाठी अहिल्यानगर शहराच्या दौऱ्यावर आलेले पंतप्रधान कार्यालयाचे उपसचिव डॉ. विपिन कुमार यांनी अहिल्यानगर महानगरपालिकेच्या हिंदुह्रदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखानाला भेट देऊन तेथील उपलब्ध सुविधा व सेवांची माहिती घेतली. महापालिकेमार्फत आयोजित निक्षय शिबिरासही त्यांनी भेट देऊन क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमांतर्गत महापालिकेने राबवलेल्या उपक्रमांचे कौतुक केले. प्रत्येक आठवड्यात आपल्या कार्यक्षेत्रात अशा शिबीराचे आयोजन करावे व जनजागृती करावी, अशा सूचना डॉ. विपिन कुमार यांनी दिल्या.

डॉ. विपिन कुमार यांनी सुरुवातीला जिल्हाधिकारी कार्यालयात राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमाचा आढावा घेतला. यावेळी जिल्हाधिकारी पंकज आशिया, महापालिका आयुक्त यशवंत डांगे, संचालक डॉ. संदिप सांगळे, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. संजय घोगरे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बापुसाहेब नागरगोजे, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. सतिश राजुरकर, जागतीक आरोग्य संघटना सल्लागार डॉ. अनिरुध्द कडू, डॉ. सुवर्णा रामटेके, जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. अविनाश आहेर, शहर क्षयरोग अधिकारी डॉ. साहिल शेख आदी उपस्थित होते.


पंतप्रधान कार्यालयाचे उपसचिव डॉ. विपिन कुमार यांनी अहिल्यानगर महानगरपालिकेच्या हिंदुह्रदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखानाला भेट देऊन तेथील उपलब्ध सुविधा व सेवांची माहिती घेतली.

बैठकीनंतर अधिकाऱ्यांनी आपला दवाखाना येथे आयोजित केलेल्या निक्षय शिबीरास भेट दिली. शिबीरामध्ये महापालिकेचे सफाई कामगार, नागरिकांची एक्स–रे तपासणी, स्पुटम तपासणी आदी विविध तपासण्या करण्यात आल्या. डॉ. विपिन कुमार यांनी उपलब्ध सेवा सुविधाची पाहणी केली. आपला दवाखाना येथील वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांच्याशी क्षयरोगाबाबत चर्चा केली. डॉ. विपिन कुमार यांनी अहिल्यानगर महापालिका क्षयरोग जनजागृती कार्यक्रमाचे कौतुक केले व प्रत्येक आठवड्यामध्ये आपल्या कार्यक्षेत्रात शिबीराचे आयोजन करावे, अशा सूचना दिल्या. तसेच, क्षय रोग दुरीकरणासाठी सुरू असलेल्या कामाबाबत समाधान व्यक्त केले.

यशवंत डांगे यांनी डॉ. विपिन कुमार यांना महापालिकेच्या आरोग्य विभागाने राबवलेल्या उपक्रमांची माहिती दिली. जागतिक क्षय रोग दिनानिमित्त करण्यात आलेली जनजागृती व शिबिरांची माहिती देण्यात आली. आरोग्य विषयक उपक्रमांमध्ये झालेल्या सुधारणा व चांगल्या कार्यामुळे राज्य शासनाच्या रँकिंगमध्ये केलेली यशस्वी कामगिरी, आरोग्यवर्धिनी केंद्रांची उभारणी, स्टाफ नर्स, आशा कर्मचाऱ्यांमार्फत घरोघरी होणारे सर्वेक्षण आदींची माहिती यशवंत डांगे यांनी डॉ. विपिन कुमार यांना दिली.

## मुलीच्या लग्नासाठी ठेवीचे पैसे मिळत नसल्याने ठेवीदाराने 'मल्टीस्टेट'च्या गेटवरच घेतला गळफास

बीड – लेकीच्या लग्नासाठी ठेवीचे पैसे मिळावेत म्हणून वारंवार चकरा मारून थकलेल्या एका ठेवीदाराने छत्रपती मल्टीस्टेट को.ऑप. क्रेडीट सोसायटीच्या गेटला गळफास घेऊन आत्महत्या केली. बीडच्या गेवराई तालुक्यातील खळेगावात १७ जून रोजी रात्री ही घटना घडली आहे. सुरेश आत्माराम जाधव असे मयत ठेवीदाराचे नाव आहे.


सुरेश जाधव

जाधव यांचे छत्रपती मल्टीस्टेट मध्ये ११ लाख आणि ज्ञानराधा मल्टीस्टेटमध्ये ५ लाख रुपये अडकले होते. मुलीच्या लग्नासाठी त्यांना तातडीने पैशांची गरज होती. मात्र गेल्या अनेक दिवसांपासून संस्थेच्या कार्यालयात फेऱ्या मारूनही त्यांना आपली रक्कम मिळाली नाही. वारंवार विनवण्या करूनही संस्था व्यवस्थापनाकडून कोणतंही समाधानकारक उत्तर न मिळाल्याने ते मानसिक तणावात होते. १७ जून रोजी रात्री उशिरा जाधव हे आपल्या कुटुंबासह संस्थेच्या कार्यालयात गेले होते. काही वेळातच त्यांनी छत्रपती मल्टीस्टेटच्या गेटला गळफास घेऊन आत्महत्या केल्याचं समोर आले. या घटनेनंतर खळेगाव परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.या प्रकारामुळे मल्टीस्टेट बँकांची विश्वासार्हता पुन्हा एकदा समोर आली आहे.

## नगर शहर परिसरात दुचाक्यांबरोबरच चारचाकी वाहनांच्याही चोऱ्या वाढल्या

(पान १ वरुन)

असताना अज्ञात चोरट्याने चोरुन नेली. ही घटना १५ जून रोजी सायंकाळी ७ ते १६ जून रोजी सकाळी १०.३० वाजण्याच्या दरम्यान घडली. याप्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सोमीनाथ धोंडीबा कडवणे (वय ३७, रा. एम इ एस कॉर्टर, गोविंदपुरा नाका, पॉटेजर रोड,अ. नगर) यांनी त्यांची होंडा कंपनीची न्यू ड्रीम युगा मोटारसायकल (क्र. एम एच १६ बी एफ १२८४) घरासमोर लावलेली असताना १६ जून रात्री १० ते १७ जून रोजी सकाळी ५ वाजेच्या दरम्यान अज्ञात चोरट्यांनी चोरुन नेली. या प्रकरणी भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नगर तालुक्यातील खडकी येथे जितेंद्र हरिभाऊ निकम (वय ४७) यांच्या घरासमोरील गोठ्यात लावलेली ग्रेनाईट ब्ल्यू रंगाची हिरो होंडा कंपनीची स्प्लेंडर मोटार सायकल (क्र. एम एच १६ पी १६७९) ही त्यांच्या शेतात काम करणाऱ्या संतोष ज्ञानेश्वर शिरसाठ (रा. नांदूर शिखरी, ता. नेवासा) याने चोरुन नेली. याप्रकरणी नगर तालुका पोलीस ठाण्यात संतोष शिरसाठ यांच्याविरुद्ध चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# गृहिणी

## आरोग्य

### रिकाम्या पोटी का पिवू नये चहा

चहा हा भारतातील अनेक लोकांचे आवडते पेय आहे. सकाळपासून ते संध्याकाळच्या थकव्यापर्यंत, चहा हे ऊर्जा देणारे पेय मानले जाते. पण चुकीच्या वेळी चहा प्यायल्याने ते नुकसानदायक होऊ शकते. चुकीच्या वेळी चहा पिल्याने तुमचे पचन बिघडू शकते, झोपेवर परिणाम होऊ शकतो. असे बरेच लोक आहेत ज्यांना सकाळी उठल्याबरोबर बेड टी पिण्याची सवय असते. जर तुम्हीही अशा लोकांपैकी एक असाल ज्यांना रिकाम्या पोटी चहा पिण्याची सवय आहे, तर ही सवय तुमच्या पोटासाठी हानिकारक ठरू शकते. रिकाम्या पोटी चहा पिल्याने गॅस, ॲसिडिटी आणि छातीत जळजळ यासारख्या समस्या उद्भवू शकतात. जेवणापूर्वी चहा पिणारे बरेच लोक आहेत. जर तुम्हीही असे केले तर ते तुमची भूक कमी करू शकते आणि पचनावर परिणाम करू शकते. चहामध्ये असलेले टॅनिन आणि कॅफिन तुमच्या शरीरात पोषक तत्वांचे शोषण रोखू शकतात. असे बरेच लोक आहेत जे अधूनमधून चहा पितात. जास्त चहा पिणे आरोग्यासाठी हानिकारक असू शकते.

## पाककला

### घोसाळ्याची भजी

**साहित्य :** ४ घोसाळी, २०० ग्रॅम बेसन पीठ, ४ चमचे कॉर्नफ्लोर किंवा तांदळाचे पीठ, ३ टेस्पून लाल तिखट, १ टीस्पून कश्मिरी लाल तिखट, १ टीस्पून धणे पूड, १/२ टीस्पून जिरेपूड, १ टीस्पून ओवा, १/२ टीस्पून हळद, चवीनुसार मीठ,

कृती : घोसाळी स्वच्छ धुवून चकत्या करून घ्याव्यात. बेसन पिठामध्ये तांदळाचे पीठ, मीठ, काश्मिरी लाल मिरची पावडर, धणे जीरे पावडर, लाल तिखट, हिंग हळद आणि ओवा घालून चांगले मिक्स करून घेणे. त्यामध्ये घोसाळ्याच्या चकत्या घालून मिक्स करा. त्यामध्ये पाणी घालून सरबरीत मिक्स करून घ्यावे. मिश्रण जास्त पातळ नको आणि घट्टही नको मध्यम स्वरूपात भिजवून घेणे. त्यामध्ये चिमूटभर खाण्याचा सोडा आणि एक चमचा गरम तेलाचे मोहन घातले त्यामुळे भजी छान पैकी गोल गरगरीत फुगून कुरकुरीत होतात. त्यानंतर एका कढईत तेल घालून ते चांगले गरम झाल्यावर त्यात तिन्ही प्रकारच्या भजी घालून चांगले खरपूस तळून घ्या.

## वास्तू

### स्वयंपाकघर संबंधी

* बेडरूमच्या वर अथवा खाली स्वयंपाक घर असू नये.
* किचन सिंक ईशान्य अथवा उत्तर दिशेला असणं शुभ मानलं जातं.
* वास्तू दोष कमी करण्यासाठी किचनमध्ये लाल रंगाचा क्रिस्टल लावावा.
* वास्तू शास्त्रानुसार किचनमध्ये डायनिंग टेबल नसावा. जर ठेवायचा असेल तर तो उत्तर पश्चिम अथवा पश्चिम दिशेला ठेवावा.
* किचनचा ओटा काळ्या ग्रॅनाईटपासून बनवू नये. हिरव्या अथा इतर रंगाचा असावा.

## सल्ला

उंदीर, गोगलगाय, अन्य किटक रात्री बागेत फिरत असतात. ते कुंडीतील रोपं, माती उध्वस्त करतात. अशावेळी बागेच्या किंवा कुंड्यांच्या चारी बाजूंना कॉफीच्या बिया ठेवा. कॉफीच्या बियांमधील कॅफेनमुळं गोगलगाय आणि अळ्या कमी होतात.

## सौंदर्य

मुलींनी लग्नाच्या ६ महिने अगोदर पासून त्वचेवर उपचार सुरू करणे गरजेचे आहे. तसेच, दर दोन ते चार आठवड्यांनी फेशियल केल्यास लग्नाच्या वेळेपर्यंत चेहरा पूर्णपणे ब्राईडल लूकसाठी तयार होऊ शकतो.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## दैनिक पंचांग

गुरुवार, दि. १९ जून २०२५

**---, शके १९४७ विश्वावसुनामसंवत्सर, ज्येष्ठ कृष्णपक्ष, उ.भा.२३।१७, सूर्योदय ०६ वा. ३० मि. सूर्यास्त ०५ वा. ४१ मि.**

### राशिभविष्य

**मेष** : पैशांच्या व्यवहारात काळजी घ्या. आजचा दिवस तुमच्यासाठी मध्यम फलदायी ठरणार आहे. प्रलंबित असेल तर ते पूर्ण होऊ शकते.

**वृषभ** : जर तुमचे कोणतेही काम बराच काळ प्रलंबित असेल तर आज तुम्हाला त्याकडे लक्ष द्यावे लागेल. भविष्यातील काही योजनांमध्ये पैसे गुंतवू शकता.

**मिथुन** : जर तुम्ही नवीन वाहन खरेदी करण्याचा विचार करत असाल तर आज तुमची इच्छा पूर्ण होईल.

**कर्क** : आज तुम्हाला तुमच्या खाण्यापिण्याकडे पूर्ण लक्ष द्यावे लागेल अन्यथा आरोग्य बिघडू शकते. महत्त्वाच्या मुद्द्यांवर चर्चा करण्यात थोडा वेळ घालवाल.

**सिंह** : आजचा दिवस तुमच्यासाठी महत्त्वाचा असणार आहे. तुम्ही सामाजिक कार्यातही पूर्ण रस दाखवाल. नोकरीच्या माध्यमातून फिरायला जाण्याची संधी मिळेल.

**कन्या** : मालमत्ता खरेदी करताना समस्या उद्भवू शकतात. तुम्हाला नवीन काम सुरु करण्याची संधी मिळेल.

**तूळ** : तरुणांना त्यांचे करिअर सुधारण्याची संधी मिळेल. भविष्यासाठी गुंतवणूक कराल. आजचा दिवस तुमच्यासाठी अनुकूल राहणार आहे.

**वृश्चिक** : तुम्ही तुमच्या पालकांना धार्मिक स्थळी घेऊन जाऊ शकता ज्यामुळे त्यांना आनंद होईल. आजचा दिवस तुमच्यासाठी मिश्रित राहणार आहे.

**धनु** : कौटुंबिक सदस्यांना मदत कराल. जोडीदाराकडून खूप पाठिंबा मिळेल. इतरांच्या कामामध्ये दखल देणे समस्या निर्माण करू शकते.


**मकर** : कामाच्या ठिकाणी तुमचे काही विरोधक तुमच्यावर वर्चस्व गाजवण्याचा प्रयत्न करतील जे तुम्हाला टाळावे लागेल.

**कुंभ** : तुम्हाला तुमच्या जोडीदाराकडून खूप पाठिंबा आणि सहवास मिळत असल्याचे दिसून येते.

**मीन** : आजचा दिवस तुमच्यासाठी खर्चिक राहणार आहे. जवळच्या व्यक्तीकडून चांगली बातमी ऐकायला मिळू शकते.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## शब्दगंध क्र. ७२०२ सौ.शैलजा कुलकर्णी




**आडवे शब्द :-** १) उच्च प्रतीचा एक तांदूळ ४) स्त्रीचे एक नाव ६) प्रत्येक; हर; किंमत; भाव ७) वर हातात धरण्यासाठी दांडा किंवा साखळी असलेला दिवा ९) पलंग विणण्याची कापडी पट्टी ११) उंट हकणारा १४) टवाळी करणारा १६) कलह; तंटा; वाद १७) दोन हातांतील जास्तीतजास्त अंतर १८) भांडखोर (स्त्री) १९) पोस्ट; मेल; डाक २०) उष्णता; वाफारा; नुकसान २१) सोळा पायल्या धान्याचे पूर्वीचे एक माप २२) अगदी गरीब; निर्धन; दरिद्री

**उभे शब्द :-** १) एक भाजी २) एक पक्षी; जंगली कबूतर ३) क्रीडा; खेळ ४) राऊळ; देवालय ५) फिर्याद; हक्क; दुष्मनी ८) एक सुगंधी वनस्पती १०) रसाने भरलेले; रसमय १२) आकाश; गगन; अंबर १३) गजवदन; गणपती; गजानन १५) गोलाकार फिरणारा वारा; चक्रवात १८) रक्कम; गोष्ट; बाब; लेखणी

### शब्दगंध क्र. ७२०१ चे उत्तर



# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

: संकलक :
ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार** : जगण्याचा दर्जा आपल्या विचारांवर अवलंबून असतो परिस्थितीवर नाही.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### मोबाईल फोनचा शोध कोणी लावला?

कॅमेरे, सेल्फीजचा विषय निघावा आणि मोबाईल फोनबद्दल बोलू नये असं होऊच शकत नाही, बरोबर ना? तुमच्यातल्या अनेकांना कंपासपेटी सारखे दिसणारे, अँटेना असलेले आणि बांधकामाच्या वीटेसारखे वजनदार मोबाईल फोन्स आठवतात का?

तुम्ही ते पाहिले नसतील तर तुम्हाला आजचे स्लीक फोन्स ही केवढी मोठी प्रगती आहे याचा अंदाज येणार नाही कदाचित.

मार्टिन कूपर यांना मोबाईल फोन्सचा जनक मानलं जातं. ३ एप्रिल १९७३ ला मोटोरोला कंपनीत सिनियर इंजिनिअर असणाऱ्या कूपर यांनी एका प्रतिस्पर्धी कंपनीतल्या मित्राला फोन केला आणि सांगितलं की मी एका अस्सल सेल फोन वरून बोलतो आहे हाच पहिला मोबाईल फोन कॉल मानला जातो.

सुरुवातीचे मोबाईल फोन्स प्रचंड महागडे होते आणि अर्थात त्यातल्या सुविधा आत्ताच्या मानानं अगदीच तोकड्या होत्या.

१९८३ साली ३५०० डॉलर्स किंमत असलेला फोन आणि आज ४-५ हजार रुपयात मिळणारा स्मार्टफोन या दोन्हीत केवढा अमूलाग्र बदल झाला आहे, हे तुम्हीच विचार करून पाहा ना!

या एका गॅजेटने कॅल्क्युलेटर, कॅलेंडर, डायरी, गजराचे घड्याळ यासारख्या अनेक यंत्रांची जागा घेतली. हल्ली लोक मोबाईलचे 'डीटॉक्स' करण्याबद्दल बोलतात ते काही उगीच नाही!


## तपती आख्यान

सूर्याला तपती नावाची एक कन्या होती. ती दिसायला सुंदर तसेच उग्र तपश्चर्या केल्यामुळे विद्वानही होती. तिच्या सौंदर्याच्या, ज्ञानाच्या बाबतीत तिला शोभेल असा पती मिळवण्याचा विचार सूर्य करीत होता. ऋक्षपुत्र संवरण हा सामर्थ्यशाली राजा असून तो रोज सूर्योपासना करीत असे. असा हा धर्मज्ञ संवरण राजा तपतीला योग्य आहे असे सूर्याला वाटले.

एकदा राजा संवरण पर्वतावर शिकारीसाठी गेला असता, तहानभुकेने व्याकूळ झालेल्या त्याच्या घोड्याचे प्राण गेले. त्यानंतर पायीच हिंडत असता त्याला तपती दृष्टीस पडली. तिचे सौंदर्य, तेज पाहून 'तू कोण आहेस?', असे त्याने विचारले. पण काहीच न बोलता ती सूर्यलोकात निघून गेली. त्यामुळे संवरण राजा मूर्च्छा येऊन जमिनीवर पडला. काही वेळाने शुद्ध आल्यावर डोळे उघडताच पुन्हा त्याला तपती समोर दिसली. 'आपण येथेच गांधर्व विवाह करू', असे त्याने सुचवल्यावर ती म्हणाली, 'तुझे जर माझ्यावर प्रेम असेल तर माझ्या वडिलांजवळ मला मागणी घाल'. इतके बोलून ती पुन्हा अंतरिक्षात अंतर्धान पावली.

संवरण राजा पुन्हा जमिनीवर कोसळला. राजाचा शोध घेत त्याचा मंत्री तेथे आला. राजाला त्याने शुद्धीवर आणले. राजाने त्याला व सर्व सैन्याला परत पाठवले व आपण आपले पुरोहित ऋषी वसिष्ठ यांचे स्मरण करून सूर्योपासना सुरु केली. तपाच्या बाराव्या दिवशी तपतीने राजाचे मन हिरावून घेतले आहे असे अंतर्ज्ञानाने जाणून वसिष्ठ तेथे आले. राजाशी बोलून ते स्वतः सूर्याकडे गेले व तपतीस घेऊन आले व दोघांचा विवाह करुन दिला. राजाने आपण सर्व राज्यकारभार अमात्यांवर सोपवून बारा वर्षे तपतीसह तेथेच पर्वतावर वास्तव्य केले. पण या काळात त्याच्या राज्यात दुष्काळाचे संकट आले, प्रजेची दुर्दशा झाली. ते पाहून वसिष्ठ राजा संवरणाला व तपतीला घेऊन पुन्हा राज्यात आले. मग सर्व सुरळीत होऊन राजा संवरणाने अनेक वर्षे तपतीसह सुखाने राज्य केले. तपती व संवरणाचा मुलगा म्हणजे कुरु. हा कुरुवंश पुढे विस्तार पावला. अर्जुन हा कुरुवंशातील श्रेष्ठ वीर. त्याचा महाभारतात तापत्य (तपतीचा वंशज) असा उल्लेख आहे.

## जीवन का अमृत (भाग १)



### सामाजिक आचरण और नैतिक जीवन

यह वास्तव में बहुत हर्ष की बात है कि जिज्ञासुओं के समूह के समूह पवित्र कदमों में आ रहे है और आपकी निष्काम सेवा कबूल की जाती है।

पवित्र भीड़ पर सत्गुरु की दया की आपके द्वारा दी गई गवाही उल्लेखनीय है। यह प्रभु का काम है और आज्ञाकारी शिष्य सत्गुरु की बढ़ती हुई दया का आनंद उठाते हैं। आपकी कोशिशें उसकी दया को बढ़ती हुई मात्रा में जागृत करेंगी और बहुत से प्यारे भाई-बहन, जो अपनी बारी के इंतजार में हैं, समय आने पर उसकी दिव्य दया को पायेंगे।

सत्संग में आपकी प्यारी कोशिशों से, कई असहाय और दुनिया से दुःखी बच्चों को, जिंदा सत्गुरु की दया और मार्गदर्शन के द्वारा अपने पिता के घर वापिस जाने का रास्ता मिल सकेगा। यह सर्वोच्च किस्म की सेवा है और वे चुने हुए लोग धन्य हैं, जिन्हें सत्गुरु के पवित्र मिशन में भागीदार बनाया जाता है। आप कई इच्छुक आत्माओं की जीवन-मरण के चक्र से मुक्ति दिलाने में सहायता करेंगे ।

***

मुझे यह जानकर खुशी हुई कि आप सत्संग को एक सुन्दर और शांत बैठक आयोजित करने में सफल हुए, जहाँ पर सारा वातावरण गुरु-शक्ति की दया मेहर से ओत-प्रोत था ।

पिता अपने प्यारे बच्चों के द्वारा पवित्र कार्य में दिए गए परस्पर सहयोग को देखकर हमेशा खुश होता है और वह अपनी जिंदगी का उभार देकर अपने प्यारे बच्चों को रूहानी फायदा पहुँचाता है।

***

बनाते हैं और दूसरों के लिए प्रेरणा का स्रोत बनते हैं ।

मैं यह जानकर प्रसन्न हूं कि आप उन भाई-बहनों का स्वागत करते हैं, जो आपके घर में एक साथ मिलकर पवित्र भजन सिमरन में बैठते हैं। जिस जगह नामलेवा भजन- सिमरन में बैठते हैं, वह जगह पवित्र हो जाती है । जब नामलेवा पवित्र उद्देश्य के लिए एक साथ कंधे से कंधा मिलाकर काम करते हैं, तो यह दिव्य दया की पराकाष्ठा है और इससे सत्गुरु के पवित्र मिशन का नाम रोशन होता है।

आत्म निरीक्षण डायरी का भरना, अपनी कमियों और गलतियों के प्रति जागरूक होने का सर्वोत्तम तरीका है। उन्हें उखाड़ फेंको और भविष्य में तरक्की के लिए योजना बनाओ। ऐसे आत्म निरीक्षण और आत्म आलोचना के बिना कोई वास्तविक तरक्की संभव नहीं है।

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## अंतरिक बल (भाग - २)

### आज्ञा चक्र

आज्ञा चक्र - १७ -

पीनियल ग्रंथि -मेलाटोनिन -आंखे

वह कोशिकाएं जिन से मेलाटोनिन हार्मोन पैदा होता है, पीनियल ग्रंथि में पायी जाती हैं। ऐसी ही कोशिकायें आंखो के अन्दर और शरीर के विभिन्न अंगो में भी पाई जाती हैं।

आंखो का मन से डायरेक्ट कनेक्शन है। जो कुछ मन में होता है वह सब आंखो में तैरता रहता है और जो आंखो में होता है वह मन में चलने लगता है। आंखों से हम जो कुछ देखते हैं वह उन कोशिकाय जिन से मेलाटोनिन हार्मोन पैदा होता है, उन पर अच्छा वा बुरा प्रभाव होता है। कोई बुरा दृश्य देख लें तो नींद नहीं आती। आंखों पर अगर हम नियंत्रण कर लें तो मन को सहज नियंत्रित कर सकते हैं।

रैम्प पर चलते हुये माडलस को देखते हुये, टी. वी. देखते हुये हम आमतौर पर पलकें नहीं झपकते। जब आप पलकें झपकते हैं तो दिमाग का कुछ हिस्सा काम करना बंद कर देता है। धीरे धीरे दिमाग डल हो जाता है। डल दिमाग को ठीक करना आसान नहीं है। जब हमें अपनी कला और एकाग्रता का प्रदर्शन करना हो तब तो पलकें झपकाना कम कर देते हैं। हम प्रति मिनिट ७ से ८ बार पलकें झपकते हैं। पलकें झपकाने से आंखे तो नम रहती हैं परंतु दिमाग का कुछ हिस्सा अवरुद्ध हो जाता है, सुन्न हो जाता है। खास काम करते समय हम आंखो को खुला रखने का प्रयास करते हैं। प्रायः कहा जाता है आंखे बोलती हैं। बोलने का मतलब है हम जिस भाव से दूसरे को देखते हैं, उस में कोई मतलब छुपा होता है जिसे मन समझ जाता है। किसी को प्यार से देखते हैं तो आंखो में खास चमक होती है।

सरसरी नजर से देखते हैं तो इस का मतलब होता है हम उस आदमी को कोई अहमियत नहीं देते। घूर कर देखते हैं तो इसका कोई खास मतलब होता है। घूर कर देखना माना बिना शब्दों के ना जाने कितनी बातें सामने वाले को सुना देते हैं। घूर कर देखना अपने आप एक काम होता है। पारखी नजर से छुपी हुई बहुत सी चीजें नजर आ जाती हैं जो आमतौर पर दिखाई नहीं देती। हमारा वजूद हरेक चीज को गौर से देखने की वजह से है। घूर कर देखने से छिपी बारीकियों का अंदाजा होता है। घूर कर देखने का मतलब है उन्हे ध्यान से देखना अर्थात देखना भी एक काम है। जब हम घूर रहे होते हैं उस समय पलकों का झपकना रुक जाता है। जब हम किसी को भी देखते हैं तो उस समय ध्यान रखो कैसे विचार उठ रहे है। देखते समय मन में अपनेपन का भाव जितना मजबूत होगा उतना ही मेलाटोनिन हार्मोन से सम्बन्धित कोशिकायें शक्तिशाली बनती हैं। जिस से नींद बहुत अच्छी आती है। हमें जीवन के सभी क्षेत्रों में सहयोग प्राप्त होता है। आंखो को नियंत्रित करने का सबसे आसान तरीका है जीवन के हर काम में कम से कम झपकाना।

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

सासु : 'तुला स्वयंपाक बनवता येत नाही का?'
सुन : 'नाही ना येत'
सासु : 'मग लग्न आधीच का नाही सांगितलेस?'
सुन : 'सरप्राईज'

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* जॉन ड्रमानी महामा कोणत्या देशाचे पंतप्रधान बनले आहेत?

– घाना

**– अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# आयुर्वेदीय बालसंस्कार

### बालकांचे आजार

आजच्या काळात अनेक कुटुंबांमध्ये आई नोकरी अथवा व्यवसाय करीत आहे. दोन्हीकडच्या जबाबदाऱ्या सांभाळताना तिची तारेवरची कसरत होत असते. अशा वेळी घरातील इतर सदस्यांनीही मुलांवर संस्कार करण्यास वेळ द्यायला हवा. आईबरोबर वडिलांनीसुद्धा ही जबाबदारी आनंदाने स्वीकारायला हवी. एक ठरावीक वेळ वडिलांनी सुद्धा मुलांना द्यायला हवा. दिवसभरातून एक तास तरी मुलांजवळ बसायला हवे. त्यांना गोष्ट सांगणे, बागेत फिरायला घेऊन जाणे, सुट्टीच्या दिवशी उपचार - १) कोणत्याही प्रकारचे जुलाब किंवा त्यासह उलट्या आढळल्यास घरगुती उपचार डॉक्टरांकडे नेण्यापूर्वी करावेत, की ज्यामुळे शरीरातील पाणी कमी होऊन बालक गळून जाणार नाही. २) जुलाब सुरू झाल्यावर त्वरित जलसंजीवनीचा वापर करावा. एक छोटे पाकीट जलसंजीवनी आणि एक ग्लास उकळून गार केलेले पाणी एकत्र करून ते पाणी बाळाला भरपूर पाजाव ' किंवा एक तांब्याभर उकळून गार केलेले पाणी घेऊन त्यात चिमटभर मीठ आणि मूठभर लिल साखर व चवीला अर्धे लिंबू पिळावे व ते बाळाला वारंवार पाजावे. न्छ ३) स्तनपान करीत असलेले बालक सहा-आठ वेळा संडास करीत असते. पण काही स्त्रिया यालाच जुलाब समजून त्याला उपचारासाठी डॉक्टरांकडे घेऊन जातात. डॉक्टरांनी समजावून सांगितले, तरी त्यांचे समाधान होत नाही व नाईलाजाने त्या बालकाला औषधांचा भडिमार करतात.

आजच्या काळात अनेक कुटुंबांमध्ये आई नोकरी अथवा व्यवसाय करीत आहे. दोन्हीकडच्या जबाबदाऱ्या सांभाळताना तिची तारेवरची कसरत हाते असते. अशा वेळी घरातील इतर सदस्यांनीही मुलांवर संस्कार करण्यास वेळ द्यायला हवा. आईबरोबर वडिलांनीसुद्धा ही जबाबदारी आनंदाने स्वीकारायला हवी. एक ठरावीक वेळ द्यायला हवा. आईबरोबर वडिलांनीसुद्धा ही जबाबदारी आनंदाने स्वीकारायला हवी. एक ठरावीक वेळ वडिलांनी सुद्धा मुलांना द्यायला हवा. दिवसभरातून एक तास तरी मुलांजवळ बसायला हवे. त्यांना गोष्ट सांगणे, बागेत फिरायला घेऊन जाणे, सुट्टीच्या दिवशी सहलीला जाणे, तसेच एखाद्या दिवशी अनाथ आश्रमामध्ये जाऊन तेथील मुलांशी संवाद साधणे. थोडा वेळ मुलांचा अभ्यास घेणे, त्यांच्या मनात असलेल्या शंकांचे निरसन करणे, त्यांच्याशी मायेनं-आपुलकीने वागणे या सर्व जबाबदाऱ्यांमध्ये वडिलांचाही सहभाग हवा. आपल्या बाळासाठी आपण नाही वेळ देणार तर कोण देणार?

**(क्रमशः)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर
मोबाईल नं- ८७९३४००४००

# महावीर स्वामींचा संदेश घरोघरी पोहोचवणारे स्वाध्यायी हे धर्मदूतच

## श्री आदर्शऋषिजी म.सा. यांचे प्रतिपादन; जैन स्वाध्यायी संघाचे आनंदधाममध्ये संमेलनात राज्यभरातील स्वाध्यायींची लक्षणीय उपस्थिती

नगर - अखिल भारतीय श्री वर्धमान स्थानकवासी जैन स्वाध्यायी संघाने राष्ट्रसंत आचार्य सम्राट गुरूदेव श्री आनंदऋषिजी म.सा.यांच्या १२५ व्या जन्म जयंतीचे औचित्य साधून येथील आनंदधाममध्ये आयोजित केलेले जैन स्वाध्यायी संघाचे प्रथम संमेलन उत्साहपूर्ण वातावरणात झाले. या संमेलनासाठी राज्यभरामधून ५०० पेक्षा अधिक स्वाध्यायी आले होते.



श्री आनंदऋषिजी म.सा.यांच्या १२५ व्या जन्म जयंतीचे औचित्य साधून येथील आनंदधाममध्ये आयोजित केलेले जैन स्वाध्यायी संघाचे प्रथम संमेलन उत्साहपूर्ण वातावरणात झाले.

आनंदऋषिजींचे सुशिष्य महाराष्ट्र प्रवर्तक श्री कुंदनऋषिजी म.सा., प्रबुध्द विचारक श्री आदर्शऋषिजी म.सा., संस्कारप्रेमी अलोकऋषिजी म.सा., श्री पुष्पकंवरजी, श्री दिव्यदर्शनाजी, श्री विश्वदर्शनाजी, श्री उदयप्रभाजी, श्री विपुलदर्शनाजी म.सा. आदी संत-साध्वींच्या पावन सानिध्यात तसेच धार्मिक परिक्षा बोर्डचे अध्यक्ष नेमीचंद चोपडा (पाली), जैन कॉन्फरन्सचे पारस मोदी, श्रावक संघाचे अध्यक्ष हस्तीमल मुनोत, अमोलकचंद पारख, अविनाश चोरडिया, सतीश बनवट, डॉ.सुमतीलाल लोढा, सिए. रमेश फिरोदिया, श्रावक संघाचे सेक्रेटरी संतोष बोथरा, उपाध्यक्ष सतीश लोढा, आनंदराम मुनोत, कन्हैय्यालाल चंगेडिया, पद्मा राका, सोभाचंद संचेती, जवेरीलाल कांकरिया (पाली), सुनील चोपडा (जोधपूर) आदींसह स्वाध्यायी वक्ते शरद चोरडिया, स्मिता कुचेरिया, रोशन गेलेडा, आदेश बाफना, दिनेश मुनोत संमेलनात सहभागी झाले होते.

गेल्या ४५ वर्षांपासून स्वाध्यायी म्हणून धर्मसेवा करत असलेल्या स्वाध्यायी बंधूंचा नेमीचंद चोपडा यांनी भेट वस्तू देऊन सन्मान केला. अखिल भारतीय स्वाध्यायी संघाच्या अध्यक्षपदी पुण्यातील कोथरूड येथील दिनेश मुनोत यांची तसेच इतर पदाधिकाऱ्यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.

महाराष्ट्र प्रवर्तक श्री कुंदनऋषिजी म.सा. म्हणाले, स्वाध्यायींचे हे संमेलन प्रथमच होत असूनही उपस्थिती लक्षणीय असल्याचे पाहून आनंद झाला. सर्व स्वाध्यायी धर्माची प्रभावना सगळीकडे करत आहेत, याचे कौतुक वाटते.

प्रबुध्द विचारक श्री आदर्शऋषिजी म.सा.म्हणाले, भगवान महावीर स्वामींचा संदेश सर्वदूर पोहोचवणारे तुम्ही सर्व धर्मदूत आहात. स्वाध्यायींमध्ये महिलांची उपस्थिती अधिक असून आपण सर्व स्वाध्यायी निष्ठेने धर्मकार्य करत आहात. १९८१ मध्ये आचार्य श्री आनंदऋषिजींनी राहाता येथे स्थापन केलेल्या या संघाचे अहिल्यानगरीतील आनंदधाममध्ये हे पहिले संमेलन होत आहे. श्रमण संघाची अनुपम देणगी म्हणजे स्वाध्यायी संघ आहे. आचार्यश्रींनी श्रमण संघासाठी अथकपणे केलेल्या कार्यामुळेच आज आपल्या समाजाची उन्नती होताना दिसते आहे. आचार्यश्रींनी स्थापना केलेल्या धार्मिक परिक्षा बोर्डमध्ये साधू-साध्वी अध्ययन करत आहेत. आचार्यश्रींनी साधू-साध्वींना आराधनेची प्रेरणा देऊन विद्वान केले. सामायिक बरोबर ज्ञान-आराधना करणे आवश्यक आहे. सम्यक दर्शन प्राप्त करण्यासाठी इतरांकडून धर्म आराधना करून घ्या. जेथे जाल तेथे समरस व्हा.

१८९३ मध्ये शिकागो येथे झालेल्या धर्मसभेत स्वामी विवेकानंदांसह वीरचंद राघव गांधी हे पहिले धर्मदूत उपस्थित होते. वीरचंद राघव गांधी यांनी जैन धर्म, जैन दर्शन, जैन तत्त्वज्ञान याची दिलेली माहिती ऐकून स्वामी विवेकानंद आश्चर्यचकित झाले होते. केवळ चातुर्मासापुरतेच नव्हे तर जीवनभर स्वाध्यायी म्हणून कार्यरत रहा, असे आवाहन श्री आदर्शऋषिजी म.सा. यांनी केले.

दुपारच्या दुसऱ्या सत्रात बोलताना श्री आदर्शऋषिजी म.सा.यांनी स्वाध्यायींनी संस्कारासाठी एक तास वेळ देण्याची आवश्यकता प्रतिपादन केली. स्वाध्यायाने आपल्या परिवारात सामंजस्य निर्माण होईल. जैन धर्म घरा-घरात प्रतिदिन सांभाळला जाईल, असे प्रबोधन स्वाध्यायींनी करणे आवश्यक आहे, असेही त्यांनी सांगितले. संमेलनातील सत्रांचे सूत्रसंचालन डॉ. तृप्ती जैन यांनी केले.

आचार्यश्रींच्या ध्वनिमुद्रित आशीर्वचनाने संमेलनाची सांगता करण्यात आली. गौतम प्रसादीचा लाभ घेत सर्वांनी निरोप घेताना स्वाध्यायी म्हणून प्रभावीपणे कार्य करण्याचा संकल्प केल्याचे दिसून आले.

जैन स्वाध्यायी संघ संमेलनास उपस्थित राहिल्याबद्दल श्री व स्था.जैन श्रावक संघ, नगर, श्री ति.र.स्था.जैन धार्मिक परिक्षा बोर्ड आणि अ.भा. श्री व स्था. जैन स्वाध्यायी संघ यांचेवतीने आभार मानण्यात आले.

# विकसनशील भारतास केवळ अकरा वर्षात पंतप्रधान नरेंद्र मोदींनी विकसित, सक्षम व आत्मनिर्भर बनवले

## अनिल मोहिते यांचे प्रतिपादन, भाजपाच्या जिल्हाध्यक्षांनी मांडले सरकारचे कामांचे प्रगती पुस्तक

नगर - पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशाने विकसित भारताच्या अमृतकाळामध्ये सेवा, सुशासन व गरीब कल्याणाची नवी यात्रा सुरू केली आहे. सरकारच्या प्रत्येक योजनेने जनकल्याणच केले आहे. सामान्य माणसाचे जीवन सुखकर करीत देशाची जागतिकस्तरावर नवी ओळख निर्माण करून दिली आहे. सरकारने देशाच्या सीमा मजबूत केल्या करून अर्थव्यवस्था मजबूत केली. तसेच, तंत्रज्ञानाला सामान्य माणसापर्यंत पोहचवले आहे. नरेंद्र मोदींनी केवळ ११ वर्षात विकसनशील भारतास विकसित, सक्षम व आत्मनिर्भर भारत बनवत सर्वांगीण प्रगती साधली आहे, अशी माहिती भाजपाचे शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते यांनी दिली.



हिल्यानगर शहर व जिल्हा आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते. यावेळी उत्तर जिल्हाध्यक्ष नितीन दिनकर व दक्षिण जिल्हाध्यक्ष दिपीप भालसिंग उपस्थित होते.

नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारला नुकतेच ११ वर्षे पूर्ण झाली आहेत. या कालावधीत झालेल्या विकास व प्रगतीची माहिती अनिल मोहिते, उत्तर जिल्हाध्यक्ष नितीन दिनकर व दक्षिण जिल्हाध्यक्ष दिलीप भालसिंग यांनी पत्रकार परिषदेत दिली.

यावेळी अशोक गायकवाड, महेश नामदे, माजी महापौर बाबासाहेब वाकळे, सविता कोटा, केडगाव मंडल अध्यक्ष भरत ठुबे, भिंगार मंडळ अध्यक्ष सचिन जाधव, मध्यमंडल अध्यक्ष ज्ञानेश्वर काळे, बाळासाहेब भुजबळ, दादा दरेकर, महेश लांडगे, सचिन ठोकळ, विद्या शिंदे, संदीप परभणे, सचिन कुसळकर आदींसह शहरातील व जिल्ह्यातील प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.

### पुणे-छत्रपती संभाजीनगर रस्ता लवकचर सुरू होणार

उत्तर जिल्हाध्यक्ष नितीन दिनकर म्हणाले, जसा भारत देश व महाराष्ट्र राज्य प्रगती करत आहे तसाच आपला जिल्ह्यातही सर्वांगीण विकास कामे होत आहेत. केंद्र सरकारच्या व राज्य सरकारच्या सर्व योजनांची प्रभावी अंमलबजावणी होत असल्याने लाखो नागरिक या योजनांचा लाभ घेत आहेत. नगरमध्ये आता सर्व महामार्गांची कामे मार्गी लागली असून लवकरच राज्यातील पहिला पुणे ते संभाजीनगर असा तीन मजली रस्त्याचे काम सुरू होणार आहे. जिल्ह्यातील सर्व एमआयडीसींमध्ये औद्योगिक क्षेत्रातही मोठ्या प्रमाणात वाढत आहे, असे सांगून अहिल्यानगर एमआयडीसीमध्ये नवे उद्योग आणण्यासाठी पालकमंत्री विखे पाटील यांच्य माध्यमातून प्रयत्नशील आहोत.तसेच, नव्याने होणाऱ्या पिंपळगाव माळवी एमआयडीसीसाठी काही तांत्रिक अडचणी निर्माण झाल्या होत्या.त्या अडचणी दूर करण्यात यश आले असून, लवकरच पिंपळगाव माळवी एमआयडीसीत नव्याने गुंतवणूक होईल, असेही सांगितले.

# महावीरनगरमधील जैन धर्मस्थानकात २१ जूनला जनरल मिटींग व चातुर्मासनिमित्त नियोजन बैठक

नगर - सावेडीमधील महावीरनगर येथील चंदनमल सुराणा जैन धर्मस्थानकात श्रीवर्धमान स्थानकवासी जैन श्रावक संघातर्फे २१ जूनला दुपारी ४ वाजता जनरल मिटींग आणि आगामी चातुर्मास नियोजन बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. श्रावक संघाचे अध्यक्ष अनिलकुमार कटारिया यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक होणार आहे.



आचार्य आनंदऋषीजी म.सा. यांच्या आशीर्वादाने संपन्न होणारे या चातुर्मासात तत्वचिंतक महासाध्वी अमितज्योतीजी म.सा., स्वाध्यायरसिका साध्वी संयम ज्योतीजी म.सा., संगित साधिका साध्वी अनंत ज्योतिजी म.सा., नवदीक्षित साध्वी अपूर्वज्योतीजी म.सा आदि ठाणा ४ यांचा चातुर्मास मंगल प्रवेश २६ जूनला सकाळी ७.३० वाजता होणार आहे. या सोहळ्याच्या नियोजनासाठी २१ जूनला दुपारी ४ वाजता संपन्न होणारे जनरल मिटिंगमध्ये चातुर्मास मंगल प्रवेश आणि कमिटी नियुक्ती करण्यात येणार आहे.

श्रीवर्धमान स्थानकवासी जैन श्रावक संघातील सर्व सभासदांनी या बैठकीस उपस्थित रहावे, असे आवाहन श्रीवर्धमान स्थानकवासी जैन श्रावक संघातर्फे करण्यात आले आहे.

# कराळे क्लबच्या विद्यार्थ्यांची छत्रपती संभाजीनगर येथील स्विमिंग स्पर्धेत बाजी

नगर - येथे नुकत्याच झालेल्या वर्षा मंगल ओपन स्विमिंग स्पर्धेत अहिल्यानगर येथील कराळे क्लब हाऊसच्या विद्यार्थ्यांनी दमदार कामगिरी करत विजयी घोडदौड केली. एमजीएम स्पोर्ट्स क्लब अ‍ॅन्ड स्टेडियम यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या स्पर्धेत विविध वयोगटातील स्पर्धकांनी पदकांची लयलूट केली.



एमजीएम स्पोर्ट्स क्लब अ‍ॅण्ड स्टेडियम यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित स्विमिंग स्पर्धेत कराळे क्लब हाऊसच्या विद्यार्थ्यांनी पदकांची लयलूट केली.

१४ वर्षे वयोगटात तन्वी आवटे हिने ५० मि. ब्रेस्ट स्ट्रोकमध्ये रौप्य पदक, ५० मि. बॅक स्ट्रोकमध्ये रौप्य पदक तर ५० मि. फ्रीस्टाइलमध्ये कांस्य पदक पटकावले.

१० वर्षांखालील गटात काव्या मराठे हिने ५० मि. फ्रीस्टाइलमध्ये कांस्य पदक, ५० मि. बॅक स्ट्रोकमध्ये रौप्य पदक आणि ५० मि. फिन्स प्रकारात रौप्य पदक मिळवले.

१२ वर्षांखालील गटात स्वराली तांदळे हिने ५० मि. फिन्स प्रकारात कांस्य पदक पटकावले. तर १७ वर्षे वयोगटात अम्रीतसिंग रजपूत याने जबरदस्त प्रदर्शन करत एकाच स्पर्धेत पाच सुवर्णपदके मिळवत चॅम्पियनशिपचा मान पटकावला. त्याने ५० मि. फ्रीस्टाइल, ५० मि. ब्रेस्ट स्ट्रोक, ५० मि. बॅक स्ट्रोक, ५० मि. बटरफ्लाय आणि ५० मि. फिन्स या पाचही प्रकारात सुवर्णपदके मिळवली. या यशामध्ये कराळे हेल्थ क्लबचे संचालक करण कराळे आणि जलतरण विभागाचे प्रशिक्षक सर्वेश देशमुख यांचे मार्गदर्शन लाभले.

# भीतीपासून शांत-कौतुकापर्यंतचा प्रवास म्हणजे 'वडील'

## प्रसाद आंधळे यांचे प्रतिपादन

नगर - वडिलांना घरी येऊ द्या, मी त्यांना सांगेन! तुम्ही काय केले? या आईच्या वाक्याने सर्वच मुला-मुलींचा थरकाप उडतो. बहुतेक बालपण आईच्या मायेत जाते. पण त्या अबोल प्रेमाला वडिलांच्या जिव्हाळ्याची सावली असते. भीतीपासून शांत-कौतुकापर्यंतचा प्रवास म्हणजे वडील असल्याचे प्रतिपादन इंजिनिअर प्रसाद आंधळे यांनी केले.




ओएसिस इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये फादर्स डे उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी प्रसाद आंधळे आदी.

### केडगावच्या ओएसिस इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये फादर्स डे साजरा

ओएसिस इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये फादर्स डे उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात अध्यक्षीय भाषणात आंधळे बोलत होते. संस्थेच्या संचालिका वैशालीताई कोतकर, उद्योजक गणेश सातपुते, गवळी सर, दारकुंडे मॅडम, जोशी मॅडम, भैरवनाथ एज्युकेशन सोसायटीचे सदस्य, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, पालक व विद्यार्थी उपस्थित होते.

पुढे आंधळे म्हणाले की, लहानपणाची वडिलांची भिती नंतर आदर व प्रेमात रूपांतरित होते. वडिल मुला-मुलींचे एक चांगले मित्र बनतात. फादर्स डे आपल्या वडिलांप्रती प्रेम व्यक्त करण्याचा दिवस असून, यातून मुलांमध्ये वडिलांचा त्यांच्यासाठी असलेला त्याग, प्रेम आणि कष्टाची जाणीव करुन देणारा दिवस ठरणार असल्याचे त्यांनी सांगितले.

संस्थेच्या संचालिका वैशालीताई कोतकर यांनी फादर्स डे च्या शुभेच्छा देवून विद्यार्थी-पालकांनी एकमेकांशी संवाद साधून मैत्रीपूर्ण नाते निर्माण करण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक गवळी यांनी केले. कार्यक्रमास उपस्थित पालक कारखिले, हरिदास शिंदे, पांडुरंग शिंदे, स्वरूप काळे, आबासाहेब नेहूल यानी ओएसिस स्कूलच्या विविध उपक्रमांचे कौतुक केले.

इयत्ता नववीच्या विद्यार्थिनींनी वडिलांवर आधारित सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून उपस्थितांची मने जिंकली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांनी केले. खान यांनी आभार मानले.

# ब्राह्मण समाजातील दहावी बारावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा २२ जून रोजी कौतुक सोहळा

नगर - २०२५ मध्ये दहावी- बारावीच्या परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या ब्राह्मण कुटुंबातील विद्यार्थ्यांचा कौतुक सोहळा ब्राह्मण बिझनेस नेटवर्क वेलफेअर असोसिएशन ट्रस्ट तर्फे आयोजित करण्यात आला असून, शहर तसेच तालुक्यातील विद्यार्थ्यांनी या कौतुक सोहळ्यात सहभागी होण्याचे आवाहन संस्थेचे विश्वस्त चिन्मय सुखटणकर यांनी केले आहे.

Bramhan Business Network Welfare Association

ते पुढे म्हणाले की, गेली दहा वर्षे संस्था गुणवंत विद्यार्थ्यांचा कौतुक सोहळा आयोजित करीत असून कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी म्हणून दंतवैद्यक तथा रंगभूमी कलाकार डॉ. हृषीकेश कुलकर्णी उपस्थित राहणार आहेत.

ब्राह्मण समाजातील व्यावसायिक, नोकरदार आणि विद्यार्थ्यांच्या सामाजिक, शैक्षणिक, मानसिक तथा बौद्धिक विकासासाठी संस्था कार्यरत असून मुलांसाठी विविध कार्यक्रम आयोजित करणार असून मुलांना यानिमित्ताने एकत्र येऊन परिचय वाढण्याची संधी मिळत असल्याचे त्यांनी सांगितले.

ट्रस्टच्या कार्यकारणी सदस्य शिल्पा सोमणी यांनी सांगितले की, २२ जून रोजी सकाळी ९.३० वाजता सुरू होणार असून चितळे रोडवरील ऋग्वेद भवन येथे या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

अर्ज करण्याची १९ जून सायंकाळी ९ वाजेपर्यंत अर्ज दाखल करण्याची मुदत असून अधिक माहिती करिता संस्था कार्यालय क्रमांक ८०१०४९४९९६

या क्रमांकावर संपर्क साधण्याचा आवाहन संस्थेचे सचिव निखिल कुलकर्णी यांनी केले.

# आयएमएसच्या विद्यार्थ्यांची विविध कंपन्यामध्ये निवड

नगर - हिवाळे संस्थेच्या आयएमएस या व्यवस्थापन संस्थेच्या एमबीए अभ्यासक्रमाचे विद्यार्थ्यांना नोकरी मिळाली असून कंपन्यामध्ये हजर झाले. संस्थेचे संचालक डॉ. एम. बी. मेहता यांच्या हस्ते या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. यावेळी उपसंचालक डॉ. विक्रम बार्नबस, विभागप्रमुख डॉ. प्रोनोती तेलोरे, प्रा. सुरेश खन्ना, प्रा. विजय शिंदे यांचे मार्गदर्शन लाभले.

IMS AHMEDNAGAR IMSCD&R

डॉ. मेहता म्हणाले की संस्था विद्यार्थांना गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि रोजगार मिळवून देण्यासाठी कटिबद्ध आहे. संस्था आणि उद्योग क्षेत्रातील अनुभवी व्यक्ती यांच्या संयुक्त विद्यमाने एक समिती स्थापन केलेली असून ती समिती विद्यार्थ्यांमध्ये उद्योग क्षेत्राला आवश्यक असणारे गुण वाढीसाठी संस्थेला मदत करते. त्यांच्या या सहकार्यामुळे विद्यार्थी अधिकाधिक रोजगाराभिमुख होतात. त्याचाच परिणाम म्हणून संस्थेतील विद्यार्थी अभ्यासक्रम पूर्ण होण्याआधीच नौकरीवर हजर होतात.

संस्था गेली ३० वर्ष व्यवस्थापनाचे अभ्यासक्रम शिकवत आहे त्यातून हजारो विद्यार्थी शिक्षण घेऊन बाहेर पडले असून आज उद्योग क्षेत्रात उच्च पदावर काम करत आहेत. त्यांच्याशी असलेल्या संबंधाचा देखील संस्थेला फायदा होत असून विद्यार्थांना नोकरी मिळवून देण्यात हे विद्यार्थी मोलाची भूमिका बजावतात.

विद्यार्थांना एक्साईड बॅटरी, लॉरीज नुदसेन, नेटविंड, अमेरिकन एक्सेल, बजाज फायनान्स, Dulux Paints, WNS, PHN Technology, बजाज अलियांज, डेटा मॅट्रिक्स, आदित्य बिर्ला स्वतंत्र फायनान्स, श्रीराम फायनान्स, अमेझॉन, युनि क्लिंगर, मुथुट फायनान्स, डेसिमल पॉईंट, एक्लेर्झ, helixware, क्रिसलीस, TCS, पोस्ट पेमेंट बँक, Esaf स्मॉल finance bank अशा कंपन्यामध्ये काम करण्याची संधी मिळाली आहे. मिळालेल्या संधीचे मेहनत करून आम्ही सोने अशी भावना यावेळी विद्यार्थांनी व्यक्त केली.



सारडा महाविद्यालयास रोटरी क्लब प्रियदर्शनी तर्फे जलशुद्धीकरण मशीन भेट देण्यात आले.

# सारडा महाविद्यालयास रोटरी क्लब प्रियदर्शनीतर्फे जलशुद्धीकरण मशीन भेट

नगर - पेमराज सारडा महाविद्यालयास रोटरी क्लब प्रियदर्शनी तर्फे देण्यात आलेल्या अत्याधुनिक जलशुद्धीकरण मशीन व ठंड पाण्यासाठी कुलरचे उद्‌घाटन झाले. यावेळी हिंद सेवा मंडळाचे अध्यक्ष प्रा.शिरीष मोडक, सचिव संजय जोशी, ज्येष्ठ मार्गदर्शक अजित बोरा, सारडा महाविद्यालयाचे चेअरमन डॉ.पारस कोठारी, संचालक सुमतीलाल कोठारी, प्रा,ज्योती कुलकर्णी, जगदीश झालानी, दिलीप शहा, प्राचार्य डॉ.माहेश्वरी गावित, रोटरी क्लब प्रियदर्शनीच्या अध्यक्षा मीनल बोरा, सेक्रेटरी स्वाती गुंदेचा, प्रोजेक्ट चेअरमन आशा फिरोदिया, सहाय्यक प्रांतपाल प्रा.किरण कारला, प्रतिभा धूत, ज्योती गांधी, स्वाती मुदगल, प्रभा खंडेलवाल, सविता काळे व ईश्वर बोरा आदी उपस्थित होते.

संस्थेचे कार्याध्यक्ष डॉ.रमेश झरकर म्हणाले, सध्या पाण्यामुळे अनेक आजार होत आहेत. त्यामुळे शुद्ध पाणी पिण्यास मिळणे आवश्यक आहे. याचे महत्व ओळखून रोटरी प्रियदर्शनी क्लबच्या वतीने सारडा महाविद्यालयास जलशुद्धीकरण मशीन व कुलर भेट देऊन उत्कृष्ट काम केले आहे. सामाजिक दायित्वाच्या भावनेने होत असलेले रोटरी क्लबचे कार्य कौतुकास्पद आहे.

प्रास्ताविकात मीनल बोरा म्हणाल्या, रोटरी क्लब कायमच जेथे गरज आहे तेथे सर्वप्रथम पोहचत मदत करत आहे. सारडा महाविद्यालयात विद्यार्थ्यांना चांगले शिक्षण घेताना शुद्ध पाणी पिण्यास मिळावे यासाठी रोटरी क्लब प्रियदर्शनी क्लबच्या वतीने जलशुद्धीकरण मशीन व ठंड पाण्याचे कुलर देण्यात आले आहे. यासाठी अशा फिरोदिया यांनी मोलाचे सहकार्य केले आहे.

यावेळी क्लबच्या ज्येष्ठ सदस्या आशा फिरोदिया यांनी रोटरी क्लबच्या कार्याची माहिती विद्यार्थ्यांना सांगितली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.राजू रिक्कल यांनी केले. उपप्राचार्य प्रा.गिरीश पाखरे यांनी आभार मानले. यावेळी प्रबंधक अशोक असेरी, प्रा. सुजित कुमावत, संस्थेचे सहाय्यक सचिव बी.यू.कुलकर्णी, योगेश देशमुख आदींसह सर्व प्राध्यापक उपस्थित होते.

# अहमदनगर होमिओपॅथीक मेडिकल कॉलेज व हॉस्पिटल येथे जागतिक रक्तदाता आणि जागतिक सिकलसेल दिनानिमित्त १९ जून रोजी रक्तदान शिबीर

नगर - अहमदनगर होमिओपॅथीक शिक्षण संस्थेचे अहमदनगर होमिओपॅथीक मेडिकल कॉलेज व हॉस्पिटल सावेडी रोड, अहमदनगर आणि जनकल्याण ब्लड बँक यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक रक्तदाता दिन (१४ जून) आणि जागतिक सिकलसेल दिन (१९ जून) निमित्त १९ जून रोजी सकाळी १० ते दुपारी २ या वेळेत अहमदनगर होमिओपॅथीक मेडिकल कॉलेज आणि हॉस्पिटल येथे रक्तदान शिबीराचे आयोजन केले असल्याची माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य व रुग्णालयीन अधिक्षक डॉ. सुनिल पवार यांनी दिली आहे.

या शिबीरामध्ये सहभागी होऊन रक्तदान करावे, असे आवाहन संस्थेचे अध्यक्ष डॉ. भुषण अनभुले, उपाध्यक्ष भुषण चंगेडे, खजिनदार डॉ. विलास बी सोनवणे, सचिव डॉ. डी. एस. पवार, सहसचिव लक्ष्मीनिवास सारडा, संचालक बोरा आर.एस, अभय मुथ्था, शिवाजी रणसिंग, डॉ. समीर होळकर, राजेंद्र मेहेत्रे, डॉ. ऋतुजा चव्हाण, कृष्णा क्षत्रिय तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुनिल पवार व आर एम ओ. डॉ. स्नेहल सोलनकर यांनी दिली आहे.

# सावेडी भागातील रस्त्यांना डॉ.मधुसूदन बोपर्डीकर आणि डॉ. देविप्रसाद खरवंडीकर यांची नावे द्यावीत

## रसिक ग्रुपची आमदार संग्राम जगताप यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी



रसिक ग्रुपच्या वतीने सावेडी भागातील रस्त्यांना डॉ.मधुसूदन बोपर्डीकर व डॉ.देविप्रसाद खरवंडीकर यांची नावे देण्याच्या मागणीचे निवेदन आ.संग्राम जगताप यांना देण्यात आले.

नगर – अहिल्यानगर जिल्हातील संगीत क्षेत्रातील पितृतुल्य व्यक्तिमत्व स्व.डॉ. मधुसूदन बोपर्डीकर यांचे नाव त्यांचे निवासस्थान असलेल्या प्रोफेसर कॉलनी जवळील रस्त्यास देण्यात यावे. तसेच स्व.डॉ.देविप्रसाद खरवंडीकर यांचे नाव गुलमोहर रोड वरील आनंद विद्यालया समोरील रस्त्यास देण्यात यावे, अशा मागणीचे निवेदन रसिक ग्रुपच्या वतीने आ.संग्राम जगताप यांना अध्यक्ष जयंत येलुलकर यांनी दिले. यावेळी आ.संग्राम जगताप म्हणाले, कै. डॉ.मधुसूदन बोपर्डीकर व डॉ.कै. देविप्रसाद खरवंडीकर या दोन्ही तपस्वींचे कार्य खूप महान होते. हे दोन्ही व्यक्तिमत्व शहराचे वैभव होते. त्यामुळे त्यांची नावे रस्त्यांना देण्याची रसिक ग्रुपने केलेली मागणी योग्यच आहे, असे सांगून सकारात्मक प्रतिसाद दिला.

यावेळी प्रास्ताविकात जयंत येलूलकर म्हणाले, डॉ.मधुसूदन बोपर्डीकर यांचे संगीत व साहित्य क्षेत्रात मोलाचे कार्य होते. आपल्या अलौकिक अभ्यासामुळे त्यांनी नगरचे नाव देशपातळीवर उंचावले होते. त्यांनी हजारो विद्यार्थी घडवले आहेत. त्यांचे कार्य व स्मृती कायम नगरकरांच्या मनात रहाव्यात यासाठी स्व.डॉ. देवीप्रसाद खरवंडीकर यांचे निवासस्थान असलेल्या प्रोफेसर कॉलनी जवळील रस्त्यास त्यांचे नाव देण्यात यावे. तसेच डॉ. देविप्रसाद खरवंडीकर यांचे शास्त्रीय संगीत व संस्कृत भाषेवर प्रभुत्व होते. त्यांच्या या महान कार्याबद्दल देशपातळीवरील अनेक पुरस्कार मिळाले होते. अशा व्यक्तिमत्वाच्या स्मृती कायम नगरकरांच्या मनात रहाव्यात यासाठी त्यांचे निवासस्थान असलेल्या गुलमोहर रोड वरील आनंद विद्यालया समारील रस्त्यास त्यांचे नाव देण्यासाठी आ.संग्राम जगताप यांनी पुढाकार घ्यावा. आ.संग्राम जगताप हे संवेदनशील व्यक्तिमत्व आहे. ते कायमच साहित्य, कला, नाट्य क्षेत्राल प्रोत्साहन देत आहेत.

यावेळी अशोक गांधी, शहर बँकेचे संचालक अशोक कानडे, शोभा ढेपे, स्नेहल वेलणकर, कुमुदिनी बोपर्डीकर, अर्चना हेंद्रे, वैशाली बोपर्डीकर, हर्षद भावे, अजय वाबळे, विक्रम सुतार, मकरंद खरवंडीकर, धनश्री खरवंडीकर, सुनील बोपर्डीकर, श्रीलेश देशमुख, पवन नाईक, अविनाश बोपर्डीकर, प्रकाश शिंदे चंद्रकांत पंडित, महेश खुपटीकर, सुरेश परदेशी, संजय परदेशी व राहुल पाटोळे आदींसह रसिक ग्रुपचे सदस्य उपस्थित होते.

# नगरच्या रिद्धी कुलकर्णीला 'संगीत विशारद' पदवी प्राप्त

## श्रुती संगीत निकेतनच्या विद्यार्थ्यांची उज्वल यशाची परंपरा कायम



नगर – अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालयाच्या वतीने घेण्यात आलेल्या एप्रिल २०२५ च्या संगीत परीक्षेत श्रुती संगीत निकेतनच्या विद्यार्थ्यांनी यशाची उज्वल परंपरा कायम राखली आहे. अहमदनगर (९९) या केंद्रात अन्वय परदेशी, गौरी केळकर, मैत्रेयी ढवण, तन्मय पडोळे, स्वराली गवारे, शीतल खराडे, भार्गव देशपांडे हे विद्यार्थी विविध परीक्षांमध्ये गायनात व हार्मोनियम वादनात केंद्रात प्रथम आले आहेत.

रिद्धी कुलकर्णी या विद्यार्थीनीने प्रथम श्रेणीसह संगीत विशारद ही परीक्षा उत्तीर्ण केली आहे.

परीक्षा निहाय निकाल पुढीलप्रमाणे प्रारंभिक – अन्वय परदेशी, गौरी केळकर, शरद बुधवंत, वरद कुलकर्णी, सोहम सूर्यपुजारी, श्रीकर ढवण, मैत्रेयी ढवण, सोहम देशमुख, संविध गांधी, आरोही दगडे, रोहिणी कुऱ्हाडे, मोहिनी खोल्लम, तन्मय पडोळे, ईश्वरी हराळ, वैष्णवी पटवा, अपूर्वा जोगदे, सुकन्या पंडित, वरद भणगे, शराली काळे, किमया जोशी, गायत्री रेखी, मनीषा तळेकर

प्रवेशिका प्रथम – स्वराली गवारे, गौरी खिस्ती, कृष्णा खराडे, प्रांजल रासने, स्वराली बुधवंत, स्वानंदी देशमुख, भार्गवी परदेशी, सई मुळे, गौरी खिस्ती, प्रगल्भ जोशी, कृष्णा साखला, गिरीश दैतुल, अनुश्री तळेकर

प्रवेशिका पूर्ण – रेणूका कुलकर्णी, सारंग कावरे, साक्षी दराडे, आरोही अनारसे,

मध्यमा प्रथम : शुभदा मुळे, अनया मुळे, शीतल खराडे, स्वरा विलायते, ओवी सानप, गंधार कुलकर्णी

मध्यमा पूर्ण : भार्गव देशपांडे, भक्तिप्रिया जोशी, उर्वी दैवज्ञ

विशारद पूर्ण : रिद्धी कुलकर्णी

सर्व विद्यार्थ्यांना पुष्पा औटी, डॉ.धनश्री खरवंडीकर आणि मकरंद खरवंडीकर यांचे मार्गदर्शन लाभले.



डिस्ट्रिक्ट् प्रोबेशन अॅण्ड ऑफ्टर केअर असोसिएशन संचालित शिशुगृह या संस्थेत दत्तक विधान कार्यक्रम पार पडला.

## डिस्ट्रिक्ट् प्रोबेशन अॅण्ड ऑफ्टर केअर असोसिएशन संचालित

# शिशुगृह संस्थेत दत्तक विधान सोहळा पार पडला

नगर – डिस्ट्रिक्ट् प्रोबेशन अॅण्ड ऑफ्टर केअर असोसिएशन संचालित शिशुगृह या संस्थेत दत्तक विधान कार्यक्रम पार पडला. इटली या देशातील २ पालकांनी संस्थेतील अनाथ १ मुलगा व १ मुलगी दत्तक घेतली असून राजस्थान येथील पालकांनी संस्थेतील १ अनाथ मुलगा दत्तक घेतला.

प्रास्ताविक शिशुगृह विभागाचे व्यवस्थापक रविंद्र कानडे यांनी केले. पाहुण्यांचा परिचय व स्वागत संस्थेच्या पदाधिकारी सौ. विनिता आशुतोष गुणे यांनी केला. दत्तक पालकांना शुभेच्छा देऊन बालकांचा कायदेशीररित्या ताबा पालकांना दिला. संस्थेच्या मानद सचिव डॉ. शकील फातिमा बशीर अहमद शेख यांनी आभार मानले.

संस्थेच्या प्रतिनिधी सौ. सिमरन बत्रा व इटलीतील पालकांनी मनोगत व्यक्त करून आभार मानले.

कार्यक्रमासाठी अहमदनगर जिल्ह्याचे बाल संरक्षण अधिकारी वैभव देशमुख, संस्थेच्या सदस्या श्रीमती स्वाती कुलकर्णी, सौ. सिमरन बत्रा, शिशुगृह सोशल वर्कर प्रतिक्षा आव्हाड, बालरोग तज्ञ डॉ. सुरेंद्र रच्चा व संस्थेचे शिशुगृह व बालगृह विभागाचे कर्मचारी व बालके उपस्थित होते.

# सामाजिक बांधिलकीतून रक्तदान

## गणेश माळी यांचे प्रतिपादन; मदरसा मदिनतुल उलुम व नगरसेवक शामीर सय्यद यांचा पुढाकाराने शिबीरात ९३ दातांचे रक्तदान



जामखेड येथे नगरसेवक शामीरभाई सय्यद व मदरसा मदिनतुल उलुम यांच्या संयुक्त विद्यमाने बकरी ईदच्या निमित्ताने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

जामखेड – रक्तदान सर्वश्रेष्ठ दान आहे. रक्तदात्याला माहीत नाही त्याचे रक्त कोणाला दिले जाणार आहे. रक्त वंश जात धर्म नाही पहात. रक्तदान हेच महान कार्य आहे. सामाजिक कामात सतत अग्रेसर असलेले तसेच समाजासाठी सतत सकारात्मक धडपड करणारे नगरसेवक शामीर सय्यद यांनी रक्तदानाच्या शिबिराच्या माध्यमातून सामाजिक बांधिलकी जपली आहे, असे प्रतिपादन जामखेडचे तहसीलदार गणेश माळी यांनी केले.

जामखेड येथे नगरसेवक शामीरभाई सय्यद व मदरसा मदिनतुल उलुम यांच्या संयुक्त विद्यमाने बकरी ईदच्या निमित्ताने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराला प्रतिसाद मिळाला असून या शिबिरात ९३ दात्यांनी रक्तदान केले. या शिबिराचे उद्घाटन तहसीलदार गणेश माळी, पोलीस निरीक्षक दशरथ चौधरी, गटविकास अधिकारी शूभम जाधव, मुफ्ती अफजल पठाण, मौलाना खलील कासमी, नगरसेवक मोहन पवार यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी मदरसा मदिनतुल उलुमचे अध्यक्ष ताहेर यासीन खान, महाराष्ट्र राज्य हज कमिटीचे सदस्य सलिमभाई बागवान, नगरसेवक अर्शद शेख, लहू पवार, शेरखान पठाण, हाबीब मास्टर, सलीम तांबोळी, अस्लम मोमीन, आय्यास शेख, नासीरभाई शेख, शाकीर शेख, मूनवर पठाण, वाजिदखान, शहाबाज सय्यद, अस्लम खान, अफताब सय्यद, अकिब आतार (पिल्लु), आरबाज शेख, आरिफ बागवान आदी उपस्थित होते.

जामखेड येथे सलग पाच वर्षापासून रक्तदान शिबिर घेऊन सामाजिक कार्यास हातभार लावल्याबद्दल जनकल्याण रक्तपेढीतर्फे नगरसेवक शामीर सय्यद यांचा तहसीलदार गणेश माळी यांच्या हस्ते स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र देऊन विशेष सत्कार करण्यात आला आहे.

जनकल्याण रक्तकेंद्राचे कर्मचारी डॉ.ओजस मुनोत, जनसंपर्क अधिकारी शरद बळे, प्रियंका आडागळे, प्रज्वल देशमुख, गया चव्हाण, अनिता तोडमल, अमित टकले, बाळासाहेब खरपुडे, किशोर यादव आदींनी रक्तसंकलनाचे कार्य केले.

# विद्यार्थ्यांच्या दप्तरासारखी शिक्षकाने तयार केली स्वतःची टिचर बॅग




शिक्षक डॉ.बागुल यांचे वडील सुभाष बागुल यांनी विद्यार्थ्यांच्या दप्तरासारखी स्वतःची टिचर बॅग तयार केली आहे यावेळी श्री समर्थ विद्या प्रसारक मंडळाचे कार्यकारीणी सदस्य अॅड. किशोर देशपांडे आदी.

नगर – भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालयाच्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरण–२०२० नुसार राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषद (NCERT) तसेच महाराष्ट्र शासनाच्या राज्य शैक्षणिक व संशोधन परिषद (SCERT), पुणे यांच्या शाळा गुणवत्ता मूल्यांकन आणि आश्वासन आराखडा SQUAAF अभियान अंतर्गत येथील कलाकार डॉ. अमोल बागुल यांनी विद्यार्थ्यांच्या दप्तरासारखे शिक्षकाचेही टि–बॅग हे दप्तर तयार केले आहे.

शिक्षक डॉ.बागुल यांचे वडील सुभाष बागुल यांनी शिलाई केलेली अंदाजे १००० किलो वजनाची, ५ फुट बाय ४ फुट आकाराची प्रतिकात्मक निर्मिती सन २०२४–२५ या शैक्षणिक वर्षांमधील महत्वपूर्ण ५१४ पेक्षा अधिक शालेय दस्तऐवजांचा समावेश असलेली टि–बॅग शिक्षणातून सक्षम राष्ट्र उभारणीचा संदेश देते. कॉपीराईट, पेटंट, ट्रेडमार्क, आयएसओ व विविध जागतिक मानांकनासाठी डॉ.बागुल यांनी ही शैक्षणिक निर्मिती पाठवली आहे.

शालेय अभिलेख विद्यार्थ्यांना शाळेत प्रवेश मिळवण्यापासून ते शाळेतून बाहेर पडण्यापर्यंतच्या प्रक्रियेची माहिती ठेवतात. या नोंदींमधून विद्यार्थ्यांना त्यांची उपस्थिती, निकाल, मूल्यांकन व इतर शालेय महत्वपूर्ण बाबी यांसारखी माहिती मिळते. टीचर बॅगमधून या शैक्षणिक घटकांचे पद्धतशीरपणे जतन होणार आहे, असे प्रतिपादन श्री समर्थ विद्या प्रसारक मंडळाचे कार्यकारीणी सदस्य अॅड. किशोर देशपांडे यांनी केले.

१०२ पटसंख्येचा वर्गशिक्षक म्हणून काम करताना वर्गातील विद्यार्थ्यांविषयीचे शालेय अभिलेख व कागदपत्रे यांचे टिचर बॅग द्वारे केलेले व्यवस्थापन प्रशासकीय कामकाज व इतर बाबींसाठी महत्त्वाचे ठरते. असे डॉ. बागुल यांनी सांगितले.

यावेळी मंडळाचे उपाध्यक्ष दीपक ओहोळ, व्हाईस चेअरमन श्रीपाद कुलकर्णी, सचिव सुरेश क्षीरसागर, खजिनदार संजय कुलकर्णी, कार्यकारिणी सदस्य सुनील जोशी, स्वप्निल कुलकर्णी, अॅड. वेद देशपांडे, विषय तज्ञ सुलभक प्रा.अतुल कुलकर्णी आदी उपस्थित होते.



स्नेहबंध सोशल फाउंडेशनच्यावतीने प्रतीक्षा सोनवणे यांना आदर्श सूत्रसंचालन पुरस्काराने गौरविताना आ.संग्राम जगताप आदी.

# आदर्श सूत्रसंचालन पुरस्काराने प्रतीक्षा सोनवणे यांचा गौरव

नगर – स्नेहबंध सोशल फाउंडेशनच्या वतीने प्रतीक्षा सोनवणे यांना आदर्श सूत्रसंचालन पुरस्काराने गौरविण्यात आले. आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते सोनवणे यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला.

शहरात झालेल्या महाराष्ट्र गौरव पुरस्कार प्रदान सोहळ्याप्रसंगी उपवनसंरक्षक धर्मवीर सालविठ्ठल, पोलीस उपाधीक्षक अमोल भारती, शिल्पकार प्रमोद कांबळे, अमित खामकर, स्नेहबंधचे संस्थापक डॉ. उद्धव शिंदे आदी उपस्थित होते.

प्रतीक्षा सोनवणे सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक व आरोग्य आदी विविध क्षेत्रात उत्कृष्ट पध्दतीने सूत्रसंचालन करत आहे. अनेक मोठ्या कार्यक्रमात त्यांनी सूत्रसंचलनाची भूमिका उत्तमपणे पार पाडली आहे. त्यांच्या या कार्याची दखल घेऊन त्यांना आदर्श सूत्रसंचालन पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे.




### केंद्रीय मंत्री सी आर पाटील यांना ग्लोबल वर्ल्ड रेकॉर्डचे प्रमाणपत्र

पुणे येथे भारतीय जनता पार्टीचे गुजरातचे प्रदेशाध्यक्ष व केंद्रीय जलशक्ती मंत्री सी आर पाटील यांना प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयाच्यावतीने १८३ विश्वविक्रम करणारे १ ले भारतीय बी के डॉक्टर दीपक हरके यांनी भेटून पुण्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त बाणेर येथे बनविण्यात आलेल्या सर्वात मोठ्या ग्रिटींग कार्डची इंग्लंडच्या ग्लोबल वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नोंद झाल्याचे प्रमाणपत्र भेट दिले. यावेळी डॉक्टर दीपक हरके यांनी केलेल्या या विश्वविक्रमाबद्दल सी आर पाटील यांनी अभिनंदन करून दिल्लीमध्ये पुन्हा भेटीचे निमंत्रण दिले.

# निमगाव वाघात कुस्ती संकुलाच्या उभारणीसाठी पै.नाना डोंगरे व्यायाम शाळेला अधिकृत मान्यता



नगर – निमगाव वाघा (ता. नगर) येथे येथे पै. नाना डोंगरे व्यायाम शाळेला नुकतीच सहाय्यक धर्मदाय आयुक्त यांच्या कडून अधिकृत मान्यता प्राप्त झाली असून, गावात लवकरच अद्ययावत कुस्ती संकुल साकारले जाणार आहे. या व्यायाम शाळेतून ग्रामीण भागातील नवोदित कुस्तीपटूंना कुस्तीचे धडे व मार्गदर्शन मिळणार आहे. या संकुलात पारंपरिक मातीचा आखाडा तसेच आधुनिक मॅटचा समावेश असणार आहे. यामुळे पारंपरिक व आधुनिक दोन्ही पद्धतींचा समन्वय साधत प्रशिक्षण दिले जाणार आहे. कुस्तीमध्ये रुची असलेल्या गरजू व होतकरू मुले–मुलींना या संकुलात प्रशिक्षण घेण्याची संधी उपलब्ध होणार आहे.

पै. नाना डोंगरे व्यायाम शाळेच्या माध्यमातून तज्ज्ञ कुस्ती प्रशिक्षकांकडून विद्यार्थी स्पर्धेसाठी तयार केले जाणार आहेत. शारीरिक ताकद, तंत्र, आणि आत्मविश्वास यांची संगती साधत खेळाडूंना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचविण्याचा मानस डोंगरे यांनी व्यक्त केला आहे.

पै. नाना डोंगरे हे नगर तालुका तालिम सेवा संघाचे अध्यक्ष असून, त्यांच्या दोन्ही मुली राष्ट्रीय पातळीवरील कुस्तीपटू आहेत, तर मुलगा सुद्धा कुस्ती क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करत आहे. गावपातळीवर खेळाची रुजवणूक व्हावी आणि नव्या पिढीला व्यायामाचे महत्त्व कळावे, यासाठीच व्यायाम शाळा हे एक माध्यम ठरणार आहे. लवकरच संकुलाच्या उभारणीस प्रारंभ करण्यात येणार असल्याची माहिती पै. डोंगरे यांनी दिली.



### शिल्पकार बालाजी वल्लाल यांचा महाराष्ट्र गौरव पुरस्काराने गौरव

स्नेहबंध सोशल फौंडेशनच्या वतीने शिल्पकार बालाजी भैरवनाथ वल्लाल यांना महाराष्ट्र गौरव पुरस्कार महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने आदर्श शिल्पकार पुरस्कार देण्यात आला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून आमदार संग्राम जगताप, उपवनसंरक्षक धर्मवीर सालविठ्ठल, पोलिस उपअधीक्षक अमोल भारती, शिल्पकार प्रमोद कांबळे, अमित खामकर, स्नेहबंधचे संस्थापक डॉ.उद्धव शिंदे आदी उपस्थित होते. बालाजी वल्लाल यांना त्यांच्या शिल्पकलेसाठी यापूर्वीही अनेक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

# घरासमोरील पार्किंगमधून मोपेडची चोरी; गुन्हा दाखल

नगर – स्टेशन रोडवरील भिंगारवाला एन्टर प्रायजेस, पंडीत हॉस्पीटल शेजारी, स्वास्तिक चौक येथील घराच्या समोर गेटचे आतमध्ये पार्कीगमध्ये लावलेली सुझुकी कंपनीची क्सेस मोपेड (क्र.एम एच १६ सी. एच ७०१७) ही कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरुन नेली.

या प्रकरणी प्रदिप शंकरलाल झंवर, (वय ६८, रा. भिंगारवाला एन्टर प्रायजेस, स्टेशन रोड, पंडीत हॉस्पीटल शेजारी, स्वास्तिक चौक, अ.नगर) यांनी कोतवाली पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरुन अज्ञात चोरटयाविरुध्द बी एन एस कलम ३०५ (ब) प्रमाणे चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



उपजिल्हाधिकारी म्हणून दादासाहेब गीते यांची नियुक्ती झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करताना आदिवासी संघटनेचे अध्यक्ष जगन्नाथराव सावळे, पै. वसंत मेघडंबर, एनएसएनआयएस कुस्ती कोच राजेंद्र बाप्पू कवडे, शप्पी जीलानी, सतीश वाघ आदी.

# अहमदनगर लॉयर्स को–ऑपरेटीव्ह सोसायटीचे चेअरमन यांच्याविरुध्द अविश्वास ठराव दाखल

नगर – अहमदनगर लॉयर्स को–ऑपरेटीव्ह सोसायटीचे विद्यमान चेअरमन अॅड. भूषण भागवत बऱ्हाटे यांची नुतन चेअरमनपदी निवड झाल्यानंतर संचालकाच्या वेळोवेळी मिटींगा पार पडल्या.

सदर मिटींमध्ये निर्णय होवून ठराव घेण्यात आले व त्याप्रमाणे ठराव प्रोसिडींग बुकला लिहिण्यात आले. परंतु घेतलेल्या ठरावाची अंमलबजावणी विद्यमान चेअरमन हे करीत नाहीत, तसेच सोसायटीचे कामकाजाबाबत इतर संचालकांना विश्वासात घेत नाहीत, वेळेवर हिशोब देत नाहीत, मासिक मिटींग विहीत मुदतीत बोलवत नाहीत, त्यामुळे त्यांचे कामकाजाबाबत इतर संचालकामध्ये तसेच आजीव सभासदांमध्ये तीव्र नाराजी असल्याने त्यांना पदावरून दूर करण्यासाठी १२ संचालकांपैकी ९ संचालकांनी अविश्वास ठराव आणण्याचे ठरविले. त्यानुसार अॅड. रावसाहेब गोपाळराव बर्डे यांनी उपनिबंधक, सहकारी संस्था नगर तालुका यांच्याकडे १३ जूनला ९ संचालकांच्या सह्यांचे पत्र दाखल केलेले आहे व त्यामध्ये विद्यमान चेअरमन अॅड. भूषण बऱ्हाटे यांच्याविरुध्द अविश्वास ठराव दाखल केलेला आहे व त्या संदर्भातील कारवाई करण्याबाबत उपनिबंधक, सहकारी संस्था नगर तालुका यांना कळविलेले आहे, अशी माहिती अॅड. रावसाहेब बर्डे यांनी दिलेली आहे.

# कॅलिडोस्कोप

## साबणात ब्लेड?



मध्य प्रदेशमधील ग्वाल्हेर येथील एका कुटुंबाने एका नामांकित साबण निर्मिती करणाऱ्या कंपनीच्या उत्पादनासंदर्भात गंभीर प्रश्न उपस्थित केला आहे. या कुटुंबाने विकत घेतलेल्या दहा रुपयांच्या साबणामध्ये ब्लेड सापडले. अंघोळीदरम्यान या कुटुंबातील एका चिमुकल्याने हा साबण गालावर घासल्याने त्याच्या गालाला साबणामधील ब्लेडमुळे इजा झाली. हा प्रकार समोर आल्याननंतर जखमी मुलाच्या वडिलांनी राष्ट्रीय ग्राहक हेल्पलाइन क्रमांक १९१५ वर कॉल करून अधिकृतरित्या कंपनीसंदर्भात तक्रार नोंदवली आहे. जखमी झालेल्या मुलाचे नाव अंश असे आहे. आपल्या मित्रांसोबत खेळून घरी आल्यानंतर हातपाय आणि तोंड धुण्यासाठी बाथरुममध्ये गेलेल्या अंशने साबण चेहऱ्यावर घासण्यास सुरुवात केली तेव्हा त्याला गालातून रक्त येत असल्याचे जाणवले. त्यानंतर नीट पाहिले असता साबणात काहीतरी असल्याचे त्याला दिसले. तोपर्यंत त्याचा गाल रक्ताने माखला होता.

एका बाजूने चेहरा रक्तबंबाळ झाल्याने घाबरलेल्या अंशने बाथरुममधूनच आरडाओरडा सुरू केला. मुलाचा आवाज ऐकून धावत बाथरुमम ध्ये आलेले अंशचे वडील अंगद सिंह तोमर यांना साबणात ब्लेड दिसल्यानंतर नेमके काय घडले याचा अंदाज आला. त्यांनी मुलाला धीर देत बाथरुमबाहेर काढत त्याच्या गालावर झालेल्या जखमेवर प्रथमोपचार केले. त्यांनी ग्राहक हेल्पलाइन क्रमांकावर घडलेल्या प्रकाराची माहिती देत अधिकृत तक्रार दाखल केली.

**मुलाच्या जीवाला होता धोका**

पॅकेजिंगदरम्यान ब्लेड साबणात अडकले अथवा स्थानिक दुकानामध्ये साबणाशी काही छेडछाड केल्याने हा प्रकार घडला याबद्दलची कोणतीही माहिती अद्याप उपलब्ध होऊ शकली नाही. बाहोदपूरमधील आनंद नगर येथे राहणाऱ्या सिंह कुटुंबाने स्थानिक किरणामालाच्या दुकानातून खरेदी केलेल्या साबणामध्ये अशाप्रकारे ब्लेड आढळून आल्याने अंगद सिंह यांनी स्वत: या दुकानात जाऊन तक्रार केली. त्या वेळी दुकानदारालाही सारा प्रकार ऐकून धक्का बसला. त्याने या ब्लेड असणाऱ्या साबणाच्या जागी दुसरा साबण दिला; मात्र घरी गेल्यानंतर अंगद यांनी हा साबण पाण्यात टाकून चाचपणी केली असता त्यामध्येही ब्लेड आढळून आले. अंगद यांनी १९१५ या राष्ट्रीय ग्राहक तक्रार हेल्पलाइन क्रमांकावर कॉल केला. या प्रकारामुळे माझ्या मुलाचा जीवही जाऊ शकला असता, असे अंगद यांनी तक्रारीत म्हटले आहे.

**न्यायालयात जाण्याचा इशारा**

ऑनलाइन माध्यमातून तक्रार करताना त्यांनी साबणाच्या फोटोसहीत इतर माहितीही दिली आहे. या प्रकरणात संबंधित कंपनीवर कठोर कारवाई करण्यात आली नाही, तर आपण न्यायालयात हे प्रकरण घेऊन जाऊ, असा इशारा अंगद यांनी दिला आहे.

**कंपनीचे म्हणणे**

साबणात रेझर ब्लेड आढळल्याच्या कथित प्रकरणांबद्दल आम्हाला मीडिया रिपोर्ट्समधून माहिती मिळाली आहे, असे कंपनीने यासंदर्भात जारी केलेल्या एका निवेदनात म्हटले आहे. या दाव्याची सत्यता पडताळण्यासाठी कंपनी चौकशी करत आहे. आजपर्यंत, आम्हाला कोणत्याही ग्राहकाकडून कोणतीही औपचारिक तक्रार किंवा अशाप्रकारच्या घटनेची सूचना मिळालेली नाही किंवा कोणत्याही व्यक्तीने आमच्याशी थेट संपर्क साधण्याचा प्रयत्न केलेला नाही. आमच्या सर्व साबणाच्या कव्हरवर आमचे ग्राहक सेवा संपर्क तपशील छापलेले असतानाही आमच्याकडे कोणीही अधिकृत तक्रार नोंदवलेली नाही. त्यामुळेच आम्ही सध्या आरोपाच्या सत्यतेवर भाष्य करू शकत नाही. सध्या तरी प्रथम दर्शनी हे बनावट उत्पादनांचे प्रकरण किंवा ब्रँडची प्रतिष्ठा खराब करण्याच्या उद्देशाने चालवलेल्या दुर्दैवी मोहीमेचा भाग असल्याचे दिसत आहे.

**साबण विक्रेत्याच्याही संपर्कात**

आम्ही तक्रारदाराशी संपर्क साधण्याचा प्रयत्न करत आहोत. तथापि, आमच्याकडे त्यांचे संपर्क तपशील नाहीत. याव्यतिरिक्त, आम्ही ज्या घाऊक विक्रेत्याकडून साबण खरेदी केला होता, त्यांच्याशी संपर्क साधला आहे आणि चाचणीसाठी नमुने गोळा केले आहेत. आम्ही माध्यमांना विनंती करतो, की त्यांच्याकडे असलेली कोणतीही संबंधित माहिती देऊन आम्हाला मदत करावी, विशेषतः त्यांनी दावा करणाऱ्या व्यक्तीची मुलाखत घेतली असल्याने आम्हाला यामध्ये सहकार्य करावे, असे कंपनीने कंपनीने निवेदनात म्हटले आहे.

## आशियातील श्रीमंत गाव

भारतातल्या एका गावातील बहुतेक लोकसंख्या अनिवासी भारतीय आहे. हे गाव आशियातील सर्वात श्रीमंत गाव आहे. टुमदार घरे, डोंगर अन् विकसित असे हे गाव असून तिथे १७ बँका, शॉपिंग मॉल आणि थिएटरदेखील आहे. देशातील श्रीमंत गावांच्या यादीत हे गाव अव्वलस्थानी आहे. या ठिकाणचे लोक आजही शेती करतात, पण या लोकांची बँकातील रक्कम ऐकून आवाक होण्याची वेळ येते. लोक परदेशातून पैसे कमवून गावातील बँकांमध्ये ट्रान्स्फर करतात. गुजरातमधील भूजमधील माधापूर या छोट्याशा गावाची ही एक वेगळी ओळख आहे. आशियातील सर्वात श्रीमंत गाव म्हणून या गावाची ओळख निर्माण झाली आहे. फक्त ३२ हजार लोकसंख्या असलेल्या या गावातील लोकांकडे सात हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त रकमेच्या मुदत ठेवी आहेत. हा एक विक्रम आहे. भारत सरकारनेही तो मान्य केला आहे.



**६५ टक्के लोक एनआरआय**

एकूण लोकसंख्येच्या ६५ टक्के एनआरआय लोकसंख्येमुळे माधापूर इतके समृद्ध आहे. हे एनआरआय प्रामुख्याने आफ्रिका, अमेरिका, ब्रिटन, कॅनडा, ऑस्ट्रेलिया आणि न्यूझीलंडमध्ये आहेत. माधापूरमधील बँक खात्यात जमा झालेले पैसे वाया जात नाहीत. त्यामुळे गाव विकासाचे एक मॉडेल बनले आहे. या पैशाने चांगले रस्ते, तलाव, शाळा, महाविद्यालये, आरोग्य केंद्रे आणि मंदिरे बांधण्यास मदत झाली आहे. या गावात एचडीएफसी, स्टेट बँक, पंजाब नॅशनल बँक, ॲक्सिस, आयसीआयसीआय, युनियन बँक आणि प्रमुख खासगी बँका मिळून तब्बल १७ बँका आहेत.





## राजस्थानात विधवांचे गाव!

राजस्थानमधील एक गाव 'विधवांचे गाव' म्हणून ओळखले जाते. या गावाची गोष्ट फारच दुःखद आहे. राजस्थानमधील अनेक गावे सौंदर्यासाठी प्रसिद्ध आहेत, पण याच राज्यात बुंदू हे ठिकाण रकीबपासून ८५ किलोमीटर अंतरावर असलेल्या हदौती या भागात आहे. तिथे पुरुषांचा तारुण्यातच मृत्यू होतो. ४,५०० लोकसंख्या असलेले बुधपुरा हे बरार प्रदेशाचा भाग असल्याचे म्हटले जाते. त्या ठिकाणी अनेक खाणी आहेत आणि तिथले लोक या खाणींमध्ये काम करतात. याशिवाय तिथे बाहेरूनही लोक कामाच्या शोधात येतात आणि येथे स्थायिक होतात.

**खाणकामामुळे लोकांना टीबी**

सततच्या कामामुळे आणि दररोज उडणाऱ्या बारीक धुळीमुळे लोकांना टीबी होतो आणि तोही अशा प्रकारे, की ते थेट मृत्यूच्या दारात घेऊन जातो. गावात इतर कोणतेही काम नसल्याने तिथले पुरुष दगडाच्या खाणीत काम करतात आणि या दरम्यान दगडाची धूळ (सिलिका) हळूहळू त्यांच्या छातीत जमा होते आणि नंतर 'सिलिकोसिस'चे रूप धारण करते. 'सिलिकोसिस' किंवा टीबीमुळे त्यांची प्रकृती बिघडते. आजारी पडल्यावर गरिबीमुळे त्यांना योग्य उपचार मिळू शकत नाहीत आणि ते अगदी लहान वयातच मरण पावतात.

## केवळ स्टेशन वाचवण्यासाठी

उत्तर प्रदेशातल्या प्रयागराजमध्ये दयालपूर हे रेल्वे स्टेशन आहे. लोक इथे रोज येतात, तिकीट घेतात आणि घरी परत जातात. ट्रेनमध्ये चढतच नाहीत. या स्टेशनची कहाणी थोडी वेगळीच आहे. पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या आग्रहावरून १९५४ मध्ये या स्टेशनचे बांधकाम झाले, तेव्हा आजूबाजूच्या गावांमध्ये राहणाऱ्या लोकांसाठी हे स्टेशन खूप महत्त्वाचे होते.

अनेक गाड्या इथे थांबत असत, पण हळूहळू प्रवाशांची संख्या कमी झाली आणि २००६ मध्ये रेल्वेने तोटा होत असल्याचे सांगत हे स्टेशन बंद केले. रेल्वेच्या नियमांनुसार एखाद्या स्टेशनवर नियमितपणे ५० पेक्षा कमी तिकिटे विकली जात असतील तर असे स्टेशन बंद केले जाते. दयालपूर स्टेशनलाही हाच नियम लागू झाला आणि ते बंद करण्यात



आले. पण स्टेशन बंद झाल्यावर लोकांना त्याची खरी गरज जाणवू लागली. त्यांनी प्रयत्न केले आणि अखेर २०२० मध्ये रेल्वेने हे स्टेशन पुन्हा सुरू करण्यात आले. पण ते पुन्हा बंद होऊ नये यासाठी काय करायचे, हा प्रश्न होता.

स्टेशन वाचवण्यासाठी गावकऱ्यांनी एक मार्ग काढला. प्रवास करायचा नसेल तरी रोज कोणी ना कोणी स्टेशनवर जाऊन तिकीट खरेदी करायचे असे त्यांनी ठरवले. फक्त स्टेशन सुरू राहावे हीच लोकांची इच्छा आहे. आजही तिथले लोक महिन्याला सुमारे ७०० रुपयांची तिकिटे विकत घेतात, पण ट्रेनने जात नाहीत. स्टेशनवर फक्त एकच ट्रेन थांबते. एक दिवस इथे अधिक ट्रेन थांबतील अशी गावकऱ्यांना आशा आहे. चक्क वर्गणी गोळा करून ते रोज तिकीट खरेदी करतात.


## चष्मा घालाल तर...




सध्या चष्मा लागण्याचं प्रमाण बरंच वाढलं आहे. आजकाल लहानग्या मुलांनाही चष्मा लागतो. कॉम्प्युटरवर काम करणाऱ्यांना चष्मा लावाला लागतो. विविध कार्यालयांमध्ये कॉम्प्युटरला डोळे लावून बसलेल्यांच्या नाकावर चष्मा असतो. याला महिलाही अपवाद नाहीत. काही वर्षांपूर्वीपर्यंत चष्मा लावणं हे मागासपणाचं लक्षण मानलं जायचं. पण काळानुरुप यात बदल झाला. आता चष्मा लावणं स्टाईल स्टेटमेंट बनून गेलं आहे. पण जपानमधल्या कंपन्यांना महिला कर्मचाऱ्यांनी चष्मा लावणं रुचलेलं नाही. म्हणूनच महिलांनी चष्मा लावून कार्यालयात येऊ नये, असं फर्मान त्यांनी काढलं आहे. चष्मा लावल्यामुळे महिलांच्या सौंदर्यावर परिणाम होत असल्याचं कारण देत चष्मा लावायला बंदी घालण्यात आली आहे. पुरुष कर्मचारी अगदी आरामात चष्मा घालू शकतात. एअरलाईन्सपासून रेस्टॉरंटपर्यंत खाजगी क्षेत्रात काम करणाऱ्या महिला चष्मा घालून काम करू शकत नाहीत. या कंपन्या इथवर थांबलेल्या नाहीत तर काही कंपन्यांनी महिलांना मेक अप करून यायची सक्ती केली आहे. तसंच वजन कमी करण्याच्या सूचनाही केल्या आहेत. आपल्या कार्यालयातल्या महिला कर्मचारी आकर्षक दिसाव्यात, असं इथल्या कंपन्यांना वाटतं. अर्थात इथल्या महिलांनी या प्रकाराला विरोध करायला सुरूवात केली आहे. सोशल मीडियावरही विविध उपक्रम राबवले जात आहेत. त्यामुळे कंपन्या आपला हा निर्णय मागे घेणार का, याबाबत कुतुहल निर्माण झालं आहे.



## मिठाईत भरलीए हवा



भारतात तऱ्हेतऱ्हेच्या मिठाया मिळतात. या चविष्ट मिठाया बघितल्यावर कोणाच्याही तोंडाला पाणी सुटल्याशिवाय रहाणार नाही. भारतात मिठाई खाण्याचं प्रमाण जास्त असलं तरी जगभरातच वैविध्यपूर्ण मिष्टान्न तयार केली जातात. काहींचा आकार वेगळा असतो तर काहींचा प्रकार भन्नाट असतो. अशीच एक मिठाई सध्या चर्चेचा विषय ठरते आहे. ब्रिटनमधल्या शेफने जगातली सर्वात हलकी मिठाई तयार केली आहे. विशेष बाब म्हणजे ही मिठाई बनवण्यासाठी शास्त्रज्ञांची मदत घेण्यात आली आहे. या मिठाईचं वजन अवघं एक ग्रॅम आहे. आश्चर्य वाटण्याजोगी बाब म्हणजे या मिठाईच्या ९६ टक्के भागात हवा आहे. म्हणजे या मिठाईत फक्त चार टक्के घन पदार्थ आहेत. ही मिठाई बनवण्यासाठी एअरोजेलचा वापर करण्यात आला आहे. एअरोजेल हा जगातला सर्वात हलका घन पदार्थ आहे. १९३१ मध्ये याचा शोध लावण्यात आला होता. एअरोजेलमध्ये ९५ ते ९९.८ टक्क्यांपर्यंत हवा असते. म्हणूनच हा जगातला सर्वात हलका घन पदार्थ ठरतो. एअरोजेल विविध पदार्थांपासून तयार करता येतं. मात्र ही मिठाई बनवण्यासाठी अंड्याच्या पांढऱ्या भागापासून हायड्रोजेल निर्मिती करण्यात आली. यानंतर हायड्रोजेल कॅल्शियम क्लोराइड आणि पाण्यात बुडवून ठेवण्यात आली. काही काळानंतर ती एका साच्यात घालण्यात आली. ही मिठाई तयार करण्यासाठी बरीच मोठी प्रक्रिया करावी लागली. अखेर सगळ्यांच्या मेहनतीला यश आलं आणि जगातली सर्वात हलकी मिठाई तयार झाली.

## मुलाचा मृत्यू, पित्याचा स्पृहणीय उपक्रम



मध्य प्रदेशातील खंडवा जिल्ह्यातून एक हृदयस्पर्शी घटना समोर आली आहे. दुचाकी चालवताना हेल्मेट न घालणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला हादरवून सोडणारी घटना खंडवा जिल्ह्यातील पंधना विधानसभेतील गुराडिया गावात घडली. येथे एका वडिलांनी आपल्या मुलाला गमावले, पण त्यांनी उचललेल्या पावलाने संपूर्ण परिसराला विचार करायला भाग पाडले.

काही दिवसांपूर्वी गावातील आनंद सिंह सावनेर या युवकाचे रस्ते अपघातात अकाली निधन झाले. दुचाकी चालवत असताना हा अपघात झाला. दुर्दैवाने त्याने हेल्मेट घातलेले नव्हते. ही बातमी गावात पसरताच वातावरण उदास झाले. संपूर्ण गावावर शोककळा पसरली. मुलाच्या अंत्यसंस्काराच्या काही दिवसांनी वडील मुकेश सावनेर यांनी घेतलेला निर्णय या दुःखद घटनेला जनजागृती मोहिमेत रूपांतरित करणारे उदाहरण ठरला.

**पूजा, अर्चा, विधीला फाटा**

सामान्यतः पारंपारिक पूजा-पाठ आणि श्रद्धांजली सभा दहाव्या दिवशी आयोजित केल्या जातात, पण याला बगल देत मुकेश सावनेर यांनी सामाजिक संदेश देण्याचे हे एक माध्यम बनवले. त्यांनी त्यांच्या मुलाच्या स्मरणार्थ गावकऱ्यांना आणि जवळच्या तरुणांना हेल्मेट वाटप करण्याचा निर्णय घेतला. आनंदने त्या दिवशी हेल्मेट घातले असते तर तो आज जिवंत असता, असा विचार करून आपण हे पाऊल उचलल्याचे ते सांगतात. इतर कोणालाही आपला मुलगा अशा प्रकारे गमवावा लागू नये. हे दुःख कधीच संपणार नाही, पण माझ्या मुलाच्या मृत्युमुळे दुसऱ्याचे प्राण वाचू शकतील, तर कदाचित त्याचा मृत्यू व्यर्थ जाणार नाही, असे त्यांनी सांगितले.

**हेल्मेट वाटप चर्चेचा विषय**

गावात आयोजित या अनोख्या श्रद्धांजली सभेत तरुणांची गर्दी जमली होती. सर्वांचे डोळे पाणावले होते. त्याच वेळी मुकेश सावनेर यांनी सर्वांना हेल्मेटचे महत्त्व समजावून सांगितले. त्यांनी डझनभर तरुणांना हेल्मेट घालायला लावले आणि त्यांच्याकडून ते नेहमी घालणार असल्याचे वचन घेतले. यापुढे वाहन चालवताना नक्कीच हेल्मेट घालू, असे तरुणांनी या वेळी सांगितले. ही छोटीशी घटना तरुणांसाठी एक मोठा धडा बनली. एखाद्याच्या मृत्यूवर इतका अर्थपूर्ण सामाजिक संदेश पहिल्यांदाच पाहायला मिळाल्याचे स्थानिक सांगतात.

**वडिलांनी उचललेल्या पावलाचे कौतुक**

ही घटना फक्त गाव किंवा जिल्ह्यापुरती मर्यादित नव्हती, तर ही बातमी 'सोशल मीडिया'वरून व्हायरल झाली. लोक मुकेश सावनेर यांच्या या पावलाचे कौतुक करू लागले. अनेक सामाजिक संघटना आणि स्थानिक प्रशासनानेही त्यांच्या प्रयत्नांचे कौतुक केले. असे जागरूक नागरिकच समाजात बदल घडवू शकतात, असे मत व्यक्त केले जात आहे.

## खेकड्यासाठी मोजले ३२ लाख रुपये

मध्यंतरी एका खेकड्याचा लिलाव पार पडला. या खेकड्यावर कोट्यवधींची बोली लागली. अखेरीस हा खेकडा भारतीय चलनात ३२ लाख ६६ हजार रुपयांचा विकला गेला. हा जगातला सर्वात महागडा खेकडा ठरला. जपानच्या पश्चिमेकडे असणाऱ्या टोट्टरी परिसरात या खेकड्याचा लिलाव पार पडला. हा क्रस्टेशियन खेकडा आहे. तो फक्त बर्फात सापडतो. म्हणूनच तो खरेदी करण्यासाठी बरीच चढाओढ पहायला मिळते. थंडीच्या काळात जपानमध्ये मोठ्या प्रमाणावर मासे खाल्ले जातात. या काळात माशांचा लिलाव केला जातो. जपानी लोक या लिलावात मासे खरेदी करतात. या लिलावादरम्यान ट्यूना हा मासा मुख्य आकर्षण ठरतो. जगातल्या या सर्वात महागड्या खेकड्याचं वजन १.२ किलो असून लांबी १४.६ सेंटीमीटर आहे. गेल्या वर्षीही एक खेकडा भारतीय चलनात तेरा लाख रुपयांना विकला गेला होता. हा एक विक्रमच होता. या विक्रमाची नोंद गिनिज बुकमध्ये करण्यात आली होती. मात्र आता ३२ लाख ६६ हजार रुपयांना विकल्या गेल्या खेकड्याने सर्व विक्रम मागे टाकले आहेत. हा जगातला सर्वात महागडा खेकडा ठरला आहे.



# पोलिस अधिक्षकांच्या विशेष पथकाकडून जिल्ह्यात अवैध धंद्यांवर छापेमारी सुरु

## सुगंधीत तंबाखु, मावा तयार करण्याच्या साहित्यासह ४ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त



सुगंधीत तंबाखु, मावा तयार करण्याच्या साहित्यासह ५ जणांना पकडल्यानंतर त्यांच्यासमवेत पोलिस अधीक्षकांचे विशेष पथक.

नगर – जिल्ह्यातील अवैध धंद्यांवर कारवाई करण्यासाठी पोलिस अधिक्षक सोमनाथ घार्गे यांनी परिविक्षाधीन पोलीस उपअधीक्षक संतोष खाडे यांच्या नेतृत्वाखाली विशेष पथक नियुक्त केले असून या पथकाने जिल्ह्यात कारवाया सुरु केल्या आहेत. या पथकाने १७ जून रोजी रात्री १०.३० च्या सुमारास शेवगाव मध्ये छापेमारी करत सुगंधी तंबाखूचा मोठा साठा तसेच मावा तयार करण्याच्या साहित्यासह ३ लाख ९८ हजार ६०० रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे.

सदर पथक शेवगांव शहरात पेट्रोलिंग करत असताना त्यांना गोपनीय माहिती मिळाली की, काही जण महाराष्ट्र राज्यात तंबाखूजन्य पदार्थाचे विक्री व तयार करणास प्रतिबंध असताना राहते घरात गिरणीचे सहाय्याने कच्ची व पक्की सुपारी मध्ये संगुधीत तंबाखू मिसळुन मावा तयार करुन विक्री करतात. ही माहिती मिळताच पथकाने तेथे छापा टाकत खलील नचिब शहा, अल्ताफ पठाण (दोघे रा. नाईकवाडी मोहल्ला, जामा मशीद शेवगांव), कुणाल संजय पिसाळ (रा. भगतसिंग चौक शेवगांव), शहाबाज ताहेर खान पठाण, आफताब ताहेरखान पठाण (दोघे रा बंधन लॉन्स, शेवगांव) यांना मावा तयार करताना पकडले. त्यांच्याकडून सुगंधीत तंबाखु, मावा तयार करण्याचे मशीन, गिरणी असा एकूण ३ लाख ९८ हजार ६०० रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. या आरोपींच्या विरुद्ध पो.कॉ. प्रशांत आंधळे यांचे फिर्यादीवरुन शेवगांव पोलिस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम १२३,२२३,२७४,२७५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई विशेष पथक प्रमुख संतोष खाडे, पो.हे.कॉ. भिगारदिवे, दिनेश मोरे, शंकर चौधरी, दिंगबर कारखिले, मल्लिकार्जुन बनकर, उमेश खेडकर, सुनिल पवार, अजय साठे, पो.कॉ. अमोल कांबळे, अक्षय भोसले, सुनिल दिघे तसेच उपनिरीक्षक खेडकर, पो.हे.कॉ.आकाश चव्हाण, शिरसाठ, अंगरखे यांचे पथकाने केली आहे.

# बागडपट्टीतील जुगार अड्ड्यावर विशेष पोलिस पथकाचा छापा

## १३ जणांना घेतले ताब्यात, रोकडसह १९ लाख ८० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त

नगर – शहरातील बागडपट्टी येथे सुरू असलेल्या जुगार अड्ड्यावर पोलिस उपअधीक्षकांच्या विशेष पथकाने छापा टाकून कारवाई केली. यात १३ जणांना ताब्यात घेण्यात आले असून, तब्बल १९ लाख ८० हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या प्रकरणी अंमलदार महेश सर्जे राव पाखरे यांच्या फिर्यादीवरून तोफखाना पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

गणेश चोभे हा बागडपट्टी भागात एका पत्र्याच्या जागेत जुगार खेळण्याकरीता जागा उपलब्ध करुन जुगार खेळतो व खेळवतो, अशी माहिती पथकाला मिळाली होती. त्यांनी त्यांच्या पथकासह तोफखाना पोलिसांच्या कर्मचाऱ्यांना सोबत घेऊन छापा टाकला. तेथून शरीफ अकबर पटेल (वय ४०, रा. नाईकवाडी मोहल्ला, ता. नेवासा), किसन पांडुरंग अंबाडे (वय ४३, रा. चेतना कॉलनी, एमआयडीसी), आसिफ दिलावर शेख (वय ३१, रा. मध्यमेश्वरनगर, नेवासा खुर्द, ता. नेवासा), शब्बीर इब्राहीम हुसैन (वय ७१, रा. बागडपट्टी, सर्जेपुरा, मु.रा.फतेवाडी, अहमदाबाद, गुजरात), अमित कुमार अनिल सिंग (वय ३३, रा. बागडपट्टी, सर्जेपुरा, मु.रा. साबे, ता.बारसिंग, जि.नवादा, बिहार), यशवंत पंढरीनाथ ढोणे (वय ६०, रा. लोणार गल्ली, अहिल्यानगर), सचिन काळुराम सोनवणे (वय ३१, रा. बेगमपुरा, छत्रपती संभाजीनगर), राहुल प्रकाश भट (वय २४, रा. तांबटकर गल्ली), गणेश प्रकाश चोभे (वय ३९, रा. बाबुर्डी बेंद), नितीन रंजीत शिंदे (वय ३३, रा. हडपसर, ता. हवेली, जि.पुणे, ह.रा. बागडपट्टी, सर्जेपुरा), रिटुकुमार नंदलाल कुमार महांतुर (वय ४३, मुळ रा. लक्ष्मीपुर, बिलावपंच, जि.सिक्रापुर, राज्य बिहार, ह.रा. बागडपट्टी), राहुल गौरीशंकर सिंग (वय २७, रा. रुम नंबर १०८, श्रीराम नगर चाळ, हनुमाननगर, नालासोपारा, मुंबई, ह.रा. बागडपट्टी), मनोज सरदारसिंग राजपुत (वय ३०, रा. घाटरोड, काँगेसवाडी, चाळीसगाव, ता. जि.जळगाव) यांना ताब्यात घेण्यात आले. १ लाख ५ हजारांची रोकड, १६ लाखांची वाहने, २ लाख ७५ हजारांचे मोबाईल असा १९.८० लाखांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

अधिक तपास पोलिस करत आहेत.

# व्यापाऱ्यास रस्त्यात गाडी आडवी लावून धमकावले

नगर – रांजणगाव एमआयडीसी येथून व्यावसायिक मीटिंग संपवून छत्रपती संभाजीनगर कडे जाणाऱ्या व्यापाऱ्याचा पाठलाग करुन दोन ते तीन अनोळखी इसमानी लाकडी दाडके व लोखंडी रॉड दाखवून हाताचा इशारा करीत ठार मारण्याची धमकी दिली. गाडीला धडक देऊन गाडीचे नुकसान केल्याची घटना नगर पुणे रोडवरील केडगाव येथील रंगोली हॉटेल जवळ १६ जून रोजी सायंकाळी ५ वाजण्याच्या सुमारास घडली.

याबाबत अमोल ओम प्रकाश लड्डा (वय ४०, रा. शिल्पनगर, छत्रपती संभाजीनगर) यांनी कोतवाली पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी हे व्यापाराच्या दृष्टिकोनातून असलेल्या मिटींगला रांजणगाव एमआयडीसी येथे गेले. तिथे त्यांचे व्यवसाय प्रतिस्पर्धी सुरेश धोंडीबा गवळी (रा. बजाज नगर, वाळुंज, संभाजीनगर), सुदीप गाजरे (रा. सिडको, संभाजी नगर) हे लॉबी मध्ये बसलेले असताना ते फिर्यादीकडे रागाने पाहत होते. तेथील मीटिंग आटोपून त्यांच्या चारचाकी गाडी (क्र. एम एच २० एफ इ २५५०) मधून संभाजीनगर कडे निघाले असता. केडगाव येथील हॉटेल नीलच्या पुढे एक हुंडाई गाडी त्यांचा पाठलाग करीत येताना दिसली. केडगाव येथील हॉटेल रंगोली जवळ आले असता पाठीमागून येणाऱ्या कार (क्र. एम एच १६ सी व्ही ८३३४) चालकाने त्यांच्या गाडीला ओव्हरटेक करुन गाडी आडवी लावून आतील दोन ते तीन अनोळखी माणसांनी त्यांच्या हातातील लाकडी दांडके, लोखंडी रॉड दाखवत फिर्यादी यांना जीवे ठार मारण्याची धमकी दिली व फिर्यादी यांच्या गाडीला धडक देऊन गाडीचे नुकसान केले. याप्रकरणी पोलीस ठाण्यात अमोल लड्डा यांनी दिलेल्या फिर्यादीवरून अनोळखी तिघांविरुद्ध धमकी दिल्याचा गुन्हा दाखल केला.

# रात्रीच्यावेळी संशयितरित्या फिरणाऱ्या एकास पकडले

नगर – रात्रीच्या वेळी काहीतरी गैरकृत्य करण्याच्या उद्देशाने अंधारात संशयितरित्या फिरणाऱ्या एकास कोतवाली पोलिसांनी पाठलाग करुन पकडले. ही कारवाई १८ जून रोजी पहाटे १ वाजता कायनेटिक चौकातील साईसूर्या हॉटेल मागे करण्यात आली आहे.

कोतवाली पोलीस पोलीस ठाण्याच्या हद्दीत नगर पुणे रोडवर रात्रगस्त घालत असताना त्यांनी कायनेटीक चौक परिसरातील साईसूर्या हॉटेल मागे कृणालसिंग कमलसिंग जुन्नी (वय १९, रा. काटवन खंडोबा, संजयनगर, अ.नगर) हा संशयितरित्या फिरताना दिसला. तो पोलिसांची गाडी पाहून अंधारात पळू लागला असता पोलिसांनी त्याचा पाठलाग करुन पकडले. त्यास रात्री इकडे फिरण्याचा उद्देश विचारला असता त्याने उडवाउडवीचे उत्तरे देऊन खरी माहिती देण्यास टाळाटाळ केली. त्यामुळे पोलिसांनी त्यास ताब्यात घेतले. याप्रकरणी पो.कॉ. अतुल काजळे यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन कोतवाली पोलीस ठाण्यात कृणालसिंग जुन्नी याचे विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# मार्केट यार्ड मधील कृषी सेवा केंद्रातून कांद्याच्या बियाणांची चोरी

नगर – दुकाना शेजारील गोडाऊनमध्ये ठेवलेले ३७ हजार ५०० रुपये किमतीचे एलोरा कंपनीचे कांद्याचे बियाणे असलेला एक बॉक्स २० ते २१ वर्षाच्या अनोळखी तरुणाने चोरुन नेला. ही घटना मार्केटयार्ड येथे गाळा नं. दोन मध्ये जगदंबा कृषी सेवा केंद्र येथे १७ जून रोजी सायंकाळी ७ वाजण्याच्या सुमारास घडली.

याबाबत सागर श्रीप्रकाश तिपुळे (वय ३२, रा. स्वामी समर्थ मठाजवळ, संदीपनगर, सारसनगर, अ.नगर) यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की फिर्यादी यांचे मार्केटयार्ड येथे जगदंबा कृषी सेवा केंद्र असून त्यालगत गोडाऊन आहे. १७ जून रोजी नेहमीप्रमाणे सायंकाळी दुकानातील काम करुन दुकानाचे शेजारी असलेल्या गोडाऊन मध्ये फिर्यादी केले असता तेथे दुकानात ठेवलेल्या एलोरा कंपनीचे कांद्याचे बियाणाचे पाच बॉक्स मधील ३७ हजार पाचशे रुपये किमतीचा एक बॉक्स कमी दिसून आला. त्यामुळे फिर्यादी यांनी दुकानातील सीसीटीव्ही कॅमेरे चेक केले असता सायंकाळी ७ च्या सुमारास एक २० ते २१ वयोगटातील, हिरवट टी-शर्ट व काळी पॅन्ट घातलेला तरुण दुकानातून बॉक्स घेऊन जाताना दिसला. फिर्यादी यांनी मार्केटयार्ड परिसरात त्याचा शोध घेतला असता तो मिळून आला नाही.

याप्रकरणी पोलीस ठाण्यात सागर तिपुळे यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन बी एन एस कलम ३०३ (२) प्रमाणे चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# स्टेशन रोडवरील मेडिकल दुकानासमोर लावलेल्या मोटारसायकलची चोरी; गुन्हा दाखल

नगर – शहरातील स्टेशन रोडवरील आनंदऋषीजी हॉस्पिटल समोर असलेल्या मेडिकल दुकानासमोर, रस्त्याच्या कडेला लावलेली हिरो कंपनीची एचएफ डीलक्स मोटारसायकल (क्र. एम एच १९ डी जी ७७१२) कोणीतरी अज्ञात चोरट्याने चोरुन नेली. ही घटना १२ जून रोजी सायंकाळी ४ ते ५ वाजण्याच्या दरम्यान घडली.

याबाबत राजेश माधवराव गवळी (वय ३४ रा. करोडी, हदगाव, नांदेड. हल्ली रा. साईनगर, कारेगाव, ता.शिरूर, जि.पुणे) यांनी कोतवाली पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरुन अज्ञात चोरट्यावर बी एन एस ३०५ (ब) प्रमाणे चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



ग.ज. चितांबर विद्यालयात नवीन प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचा स्वागतोत्सव साजरा करण्यात आला.

# चितांबर विद्यालयात विद्यार्थी प्रवेशोत्सव उत्साहात

नगर – येथील नव विद्या प्रसारक मंडळाच्या महर्षी ग.ज. चितांबर विद्या मंदिर मध्ये नवीन प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचा स्वागतोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला.

नवीन शैक्षणिक वर्षाच्या स्वागतासाठी शाळा रांगोळी, फुगे तसेच फुलांनी सजवण्यात आली होती. ढोल ताशांच्या गजरात शाळेत नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांची मिरवणूक काढण्यात आली. औक्षण करून या सर्व विद्यार्थ्यांना सन्मानाने वर्गात नेण्यात आले.

यानिमित्त आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका विभावरी रोकडे तर प्रमुख अतिथी म्हणून संस्थेच्या सदस्या व माजी अध्यापिका देवयानी भोपे, माजी विद्यार्थिनी रोहिणी वाघमारे या उपस्थित होत्या. यावेळी व्यासपीठावर पर्यवेक्षिका मंदा शिंदे, शिक्षक प्रतिनिधी विनोद गाडगे उपस्थित होते. याप्रसंगी देवयानी भोपे यांनी विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

रोहिणी वाघमारे यांनी विद्यार्थ्यांना सुंदर गोष्टीद्वारे अभ्यासासाठी प्रेरित केले. यावेळी सर्व विद्यार्थ्यांना विद्यालयाच्या वतीने शैक्षणिक साहित्य भेट देण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व उपस्थितांचे स्वागत मुख्याध्यापिका विभावरी रोकडे यांनी केले. गणेश उघडे यांनी विद्यालयाची माहिती दिली. प्रशांत कुलकर्णी यांनी सूत्रसंचालन तर सौ. योगिता चंद्रात्रे यांनी आभार प्रदर्शन केले.

# शालेय शिक्षणाबरोबर मुलांचे आरोग्य महत्त्वाचे

## जालिंदर कोतकर यांचे प्रतिपादन; विद्यार्थ्यांच्या आरोग्यासाठी शाळेत ओपन जिमचे उद्घाटन, केडगावच्या सरस्वती विद्यालयाचा उपक्रम



केडगाव येथील सरस्वती विद्यालयात विद्यार्थ्यांना शालेय शिक्षणाबरोबरच सदृढ आरोग्यासाठी ओपन जिमचे उद्घाटन करण्यात आले.

नगर – शालेय शिक्षणाबरोबर मुलांचे आरोग्य महत्त्वाचे आहे. आरोग्य उत्तम असल्यास विद्यार्थी आपली प्रगती साधू शकतो. गेल्या काही दिवसांपासून शाळेचे मुख्याध्यापक यांनी ओपन जिमची मागणी केली होती. त्या मागणीचा पाठपुरावा डॉ. सुजय विखे याच्याकडे करण्यात आला होता. त्यांनी तात्काळ याला मंजुरी देवून काम मार्गी लावल्याचे उद्योजक जालिंदर कोतकर यांनी स्पष्ट केले.

केडगाव येथील सरस्वती विद्यालयात विद्यार्थ्यांना शालेय शिक्षणाबरोबरच सदृढ आरोग्यासाठी ओपन जिमचे उद्घाटन करण्यात आले. शाळेच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांचे उत्साहात स्वागत करुन या ओपन जीमचे लोकार्पण पार पडले.

संस्थेचे अध्यक्ष दादाराव ढवाण यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम पार पडला. ढवाण म्हणाले की, सर्वात प्रथम मी शिक्षकांचे आभार मानतो. शाळेत येणाऱ्या विद्यार्थ्यांची गुणात्मक वाढ होण्यासाठी ते सातत्याने धडपड करत असतात. जे विद्यार्थी शिक्षणात मागे पडत आहे, त्यांच्यासाठी शिक्षक एक तास अगोदर येवून त्यांचे जादा तास घेऊन शाळेच्या गुणवत्ता वाढीसाठी योगदान देत आहेत. या शिक्षकांच्या योगदानाने शाळेचा १०० टक्के निकाल लागत आहे. पालकांनी देखील मुलांच्या आरोग्यासाठी त्यांच्या डब्यात सकस आहार द्यावा. शाळेत विद्यार्थ्यांना ओपन जीमद्वारे व्यायाम करता येणार असून, विद्यार्थ्यांचा बौध्दिक व शारीरिक विकास साधला जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.

प्रास्ताविकात मुख्याध्यापक संदीप भोर यांनी शाळेत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी राबविण्यात येत असलेल्या उपक्रमाची माहिती दिली.

या कार्यक्रमासाठी संस्था समन्वयक डॉ. रवींद्र चोभे, अरुणराव यशवंत कुलकर्णी, माजी नगरसेवक मनोज कोतकर, संभाजी पवार, ज्ञानेश्वर अंदुरे, अ‍ॅड. प्रज्ञाताई आसनीकर, सुबोध गोहाड, मुख्याध्यापिका मोहिनी धर्माधिकारी आदींसह शिक्षक, कर्मचारी, पालक व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्मिता खिलारी यांनी केले. आभार शिवाजी मगर यांनी मानले.



निंबळक विद्यालयात नवागतांचे गुलाब पुष्प देऊन स्वागत करण्यात आले.

# निंबळक विद्यालयात नवागतांचे गुलाब पुष्प देऊन स्वागत

निंबळक – ग्रामविकास विद्या प्रसारक मंडळाचे माध्यमिक विद्यालय इसळक निंबळक येथे १६ जून रोजी शाळा प्रवेशोत्सव २०२५-२६ या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांची उपस्थिती व गुणवत्तावाढ यासाठी नवीन विद्यार्थ्यांचे स्वागत, पाठ्यपुस्तक वाटप कार्यक्रम घेण्यात आला. यासाठी संस्थेचे सचिव रघुनाथ गव्हाणे, सहसचिव अविनाश कोतकर, सदस्य ह.भ.प.संदीप कळसे, जेष्ठ मार्गदर्शक माधवराव कोतकर, मुख्याध्यापिका संगीता जाजगे, शंकर क्षीरसागर, प्रदीप गेरंगे, अविनाश आळंदीकर आदि उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापिका संगीता जाजगे यांनी केले. अध्यक्षीय निवड शांता कोतकर यांनी केली.

या कार्यक्रमात नवीन प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे गुलाब पुष्प, पाठ्यपुस्तके व गोड पूरक आहार देऊन स्वागत केले. त्याचप्रमाणे विद्यालयातील शिक्षक विलास कोतकर यांना राज्यस्तरीय उत्कृष्ट मराठी अध्यापन पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल व संगीता जाजगे यांची मुख्याध्यापकपदी पदोन्नती झाल्याबद्दल या दोघांचाही संस्थेकडून सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष माधवराव कोतकर यांनी अध्यक्षीय भाषणात विद्यार्थ्यांचे स्वागत करून नवीन शैक्षणिक वर्षासाठी शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी विद्यार्थी, विद्यालयातील शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेतर सेवकवृंद उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रताप बांडे यांनी केले.

# धनादेश न वटल्या प्रकरणी १ महिन्याची कैद व ३९ हजार रुपये दंडाची शिक्षा

नगर – अहमदनगर येथील अति.मुख्य न्यायदंडाधिकारी, कोर्ट नं. १९ डी. डी. कर्वे यांनी आरोपी सुनिता सुरेश मोरे यांना १ महिन्यांची साधी कैद व ३९ हजार रुपये दंड देण्याचा आदेश कोर्टाने केलेला आहे.

आरोपी सुनिता सुरेश मोरे यांनी फिर्यादी मंगलदीप मल्टीस्टेट अर्बन को. ऑप. क्रे.सोसायटी ली. एकविरा चौक, सावेडी, अहमदनगर यांचे कडून कर्ज घेतले होते, त्याचे परताव्या पोटी त्यांनी सोसायटीस धनादेश दिलेला होता. सदर धनादेश न वटल्याने फिर्यादी सोसायटीने त्यांचे विरुद्ध न्यायालात प्रकरण दाखल केले होते, त्या प्रकरणामध्ये कोर्टाने आलेल्या पुराव्याचा विचार करून आरोपींना एक महिन्याची साधी कैद व ३९ हजार रुपये दंड व दंड रक्कम न भरल्यास पंधरा दिवसांची साधी कैद अशी शिक्षा देण्याचा आदेश कोर्टाने केलेला आहे. सदर प्रकरणात फिर्यादी सोसायटीचे वतीने अ‍ॅड. अमित विजय राशिनकर यांनी काम पहिले व त्यांना अ‍ॅड. मिलिंद घोरपडे यांनी सहकार्य केले. तसेच फिर्यादी सोसायटीचे वतीने माहीतगार इसम म्हणुन सागर फुलारी यांनी साक्ष दिली.

# भिस्तबाग जिल्हा परिषद शाळेत मोफत पाठ्यपुस्तकांचे वितरण



भिस्तबाग जिल्हा परिषद शाळेत नवीन शैक्षणिक वर्षाच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तक व गुलाबपुष्पांचे वाटप करण्यात आले.

नगर – भिस्तबाग जिल्हा परिषद शाळेत नवीन शैक्षणिक वर्षाच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांचे उत्साहात स्वागत करण्यात आले. विद्यार्थ्यांचे औक्षण करुन समग्र शिक्षा अभियानांतर्गत विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तक व गुलाबपुष्पांचे वाटप करण्यात आले.

रंगीबेरंगी रांगोळीने शाळेचा परिसर सजला होता. तर प्रत्येक वर्गात आकर्षक सजावट करण्यात आली होती. नव्याने दाखल झालेल्या विद्यार्थ्यांचे शिक्षकांनी औक्षण करून स्वागत केले. मुख्याध्यापिका अनिता काळे यांच्या हस्ते जिजाऊ व सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करुन विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तकांचे वितरण करण्यात आले. यावेळी माजी नगरसेविका शारदाताई ढवण, शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा सरिता ढवण, सहशिक्षिका शितल आवारे, सुरेखा वाघ, अहिल्या सांगळे, योगिता वाघमारे आदींसह पालक व विद्यार्थी उपस्थित होते.

मुख्याध्यापिका अनिता काळे म्हणाल्या की, शहरालगत असलेली भिस्तबाग जिल्हा परिषद शाळा गुणवत्तेच्या जोरावर नावरुपास आली आहे. सर्वसामान्य वर्गातील मुले या शाळेत शिक्षण घेत असून, त्यांच्या सर्वांगीन विकासासाठी विविध उपक्रम राबविण्यात येत आहे. लोकसहभागातून शाळेत मोठ्या प्रमाणात सुधारणा करण्यात आली असून, दर्जेदार व गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यासाठी शाळा कटिबद्ध असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. माजी नगरसेविका शारदाताई ढवण यांनी जिल्हा परिषद शाळेत राबविण्यात येत असलेल्या विविध शैक्षणिक उपक्रमाचे त्यांनी कौतुक केले.

नव्याने प्रवेश घेतलेले विद्यार्थीही आनंदाने शाळेत दाखल झाले. शाळेत बनविलेल्या सेल्फी पॉईंटवर विद्यार्थ्यांनी पालकांसह फोटो घेतले. विद्यार्थ्यांच्या आनंदी चेहऱ्यांनी शाळा परिसर फुलला होता.

